# मराठा मंडळ मुलुंड, मुंबई

**[नोंदणी क्र. एफ् ५५५१ (मुंबई)].स्थापना १५ ऑक्टोबर १९७८**

## कार्यकारी मंडळ : (इ.स. २०२०-२१ ते इ.स. २०२२-२३)

**अध्यक्ष :** श्री. रमेश रघुनाथ शिर्के

**उपाध्यक्ष :** श्री. सुदाम चंद्रू म्हामूणकर (**दि. २३/०३/२०२३ पर्यंत**), श्री. अरुण विठ्ठल चव्हाण

**कार्याध्यक्ष :** श्री. महेश श्रीकृष्ण चव्हाण **सरचिटणीस :** श्री. अजय सिताराम खामकर

**सहचिटणीस :** श्री. राजन गोपाळराव भोसले, श्री. शिवाजी जगन्नाथ सावंत

**कोषाध्यक्ष :** श्री. प्रमोद द्वारकानाथ देसाई, श्री. वसंत सखारामराव भोसले

**कार्यकारिणी सदस्य :** श्री. संतोष परशुराम सावंत, श्री. दिगंबर दत्तात्रय राणे, सौ. रश्मी गणेश राणे, श्री रमेश लक्ष्मणराव शिंदे, सौ. माधुरी मारुती तळेकर, श्री. ज्ञानेश्वर नारायण भालेराव, सौ. ऐश्वर्या रविंद्र ब्रीद, श्री. अजय बळीराम माने

## कार्यकारी मंडळ : (इ.स. २०२३- २४ ते इ.स. २०२५-२६)

**अध्यक्ष :** श्री. रमेश रघुनाथ शिर्के

**उपाध्यक्ष :** श्री. अरुण विठ्ठल चव्हाण, श्री. शिवाजी जगन्नाथ सावंत

**कार्याध्यक्ष :** श्री. महेश श्रीकृष्ण चव्हाण **सरचिटणीस :** श्री. अजय सिताराम खामकर

**सहचिटणीस :** श्री. दिगंबर दत्तात्रय राणे, सौ. ऐश्वर्या रविंद्र ब्रीद

**कोषाध्यक्ष :** श्री. वसंत सखारामराव भोसले, श्री. ज्ञानेश्वर नारायण भालेराव

**कार्यकारिणी सदस्य :** श्री. राजन गोपाळराव भोसले, श्री. प्रमोद द्वारकानाथ देसाई, सौ. रश्मी (आशा) गणेश राणे, सौ. माधुरी मारुती तळेकर, श्री. अजय बळीराम माने, श्री. शंकर शांताराम दळवी, श्री. उदय मनोहर दरेकर, श्री. प्रसाद अजित साळवी

## सल्लागार मंडळ : (इ.स. २०२१- २२ ते इ.स. २०२५-२६)

**सल्लागार (निमंत्रक) :** श्री. सुरेश गेनभाऊ डुंबरे (**दि. २८/०३/२०२३ पासून** )

**सल्लागार :** श्री. संजय केशव आयरे, सौ. चित्रा अरुण धुरी, श्री. नंदकुमार यशवंत माने श्री. सुदाम चंद्रू म्हामूणकर (**दि. २४/०३/२०२३ पासून** )

## हिशेब तपासनीस

**अंतर्गत हिशेब तपासनीस** : सी. ए. अमोल विजय सावंत

**सरकारमान्य हिशेब तपासनीस** : सी.ए. सुदीप ठाकूर (ठाकूर, नाईक व देव कंपनी)

## बॅंकर्स

**बॅंक ऑफ महाराष्ट्र, सारस्वत बॅंक, कॅनरा बॅंक, बॅंक ऑफ बडोदा मुलुंड, मुंबई**

**सर्व समित्या/विभागासाठी समन्वयक : श्री. दिगंबर द. राणे /सौ. ऐश्वर्या र. ब्रीद**

## वधू-वर सूचक मंडळ

**प्रमुख : श्री. सदानंद बा. दळवी निमंत्रक : श्री. श्रीकांत बा. पालव**

श्री. शरद भ. तेरसे, सौ. सुहासिनी सु. म्हामूणकर, श्री. संजय का. परब, श्री. सतीश दा. राणे, श्रीमती चित्रा श.दळवी, सौ. ऐश्वर्या र. ब्रीद, श्री. दिगंबर द. राणे, सौ. शुभदा शं. चव्हाण, सौ. रुपाली वै. शिर्के, सौ. स्मिता शां. पवार, सौ. माधुरी मा. तळेकर, सौ. रश्मी (आशा) ग. राणे, श्री. उमेश बा. पालव, सौ.अरुणा प्र. दळवी, सौ. सई सु. परब, श्री. सुनील भ. परब, सौ. वैशाली दि. मोरे, सौ, श्रद्धा आ. पाटणकर, सौ. मनिषा अ. साळवी, श्रीमती. राजश्री म. तावडे, श्री. शेखर चं. भोसले, सौ. सुचिता अ. दळवी, श्री. प्रसाद अ. साळवी

## कार्यालयीन व्यवस्थापन व इमारत देखभाल समिती

**प्रमुख : श्री. प्रमोद व्दा. देसाई निमंत्रक : श्री. अजय ब. माने**

श्री. अजय सि. खामकर,श्री. वसंत स. भोसले, श्री. ज्ञानेश्वर ना. भालेराव, सौ. ऐश्वर्या र. ब्रीद, श्री. दिगंबर द. राणे,

## महिला आघाडी

**प्रमुखः सौ. माधुरी मा. तळेकर, निमंत्रक : सौ. मनिषा अ. साळवी**

सौ. वंदना द. लोटणकर, सौ. शिल्पा स. लाड, सौ. विजया शा. साटम, सौ. स्मिता न. राणे, सौ. रश्मी (आशा) ग. राणे, सौ. सोनाली सं. सावंत, सौ. शुभदा यो. म्हामुणकर, सौ. सोनल यो. सावंत, सौ. सुचिता र. सुर्वे, सौ. ज्योती प्र. दळवी, कु. राजश्री म. सावंत, सौ. स्वाती चं. सावंत, सौ. ऐश्वर्या र. ब्रीद,सौ. सुचिता अ. दळवी, सौ. करुणा सु. सावंत, सौ. ज्योती ज. पवार, सौ. मिनल ह. सावंत, रुपाली वै. शिर्के, सौ. शुभदा ग. परब, सौ. साईली स. परब, सौ. स्मिता शां. पवार

## सांस्कृतिक कला, क्रिडा विभाग

**प्रमुखः सौ. रश्मी (आशा) ग. राणे निमंत्रक : सौ. करुणा सु. सावंत**

सौ. ऐश्वर्या र. ब्रीद, सौ. माधुरी मा. तळेकर, श्री. अजय ब. माने, श्री. उदय म. दरेकर, श्री. श्यामसुंदर वि. परब, सौ. सोनल यो. सावंत, श्री. हेमंत सो. भोगले, श्री. निलेश शं. सुर्वे, सौ. मानसी म. म्हामूणकर, सौ. सोनाली सं.कदम, श्री. महेश आ. शिर्के, श्री. हेमंत स. लाड, श्री. संदीप व. साळवी

## वाचनालय / अभ्यासिका विभाग

**प्रमुख : सौ. मिनल ह. सावंत निमंत्रक : श्री. प्रकाश ज. पालव**

श्री. वसंत स. भोसले, श्री. शंकर शां. दळवी, श्री. मनोहर ज. जुन्नरे, श्री. संजय का. परब, सौ. विजया शा. साटम, श्री. दिपक आ. जाधव, श्री. सुधाकर ब. चासकर, सौ. स्मिता शां. पवार, श्री. नंदकिशोर म. आवटे

## युवा, उद्योग, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान विभाग

**प्रमुख :श्री. संतोष प. सावंत, निमंत्रक : श्री. प्रसाद अ. साळवी**

सौ. उज्वला रा. साटम, श्री. हेमंत स. लाड, श्री. वैभव र. शिर्के, श्री. कौस्तुभ वि. लाड, श्री. सचिन ब. माने, श्री. मयुर ह. काळे, श्री. विनय ना. शेलार

## ज्येष्ठ नागरिक समन्वय व आरोग्य विभाग

**प्रमुखः श्री. राजन गो. भोसले निमंत्रक : श्री. हरिश्चंद्र शं. सावंत**

श्री. प्रभाकर श्री. यशवंतराव, श्री सहदेव बा. कदम, श्री. सदानंद बा. लाड, श्री. तुकाराम बा. थोरात, श्री. महादेव वा. सावंत, श्री. यशवंत ग. चव्हाण, श्री. मधुकर का. मालुसरे, श्री. भरत वै. सावंत, श्री. संदीप व. साळवी



## अध्यक्षीय मनोगत !

**सभासद बंधू-भगिनींनो,**

नमस्कार !

गेल्या वर्षी २७ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या चव्वेचाळीसव्या वार्षिक सर्वसाधारण सभेने निवडून दिलेल्या नविन इ. स. २०२३/२४ या आर्थिक वर्षासाठी अधिकारावर आलेल्या कार्यकारी मंडळाला सुमारे सात महिन्यांचा कालावधी या अहवालसाली उपलब्ध झाला. आजवरच्या उज्ज्वल परंपरे नुसार विद्यमान कार्यकारी मंडळाने आपल्या संस्थेचा कारभार उत्तम प्रकारे चालविला आहे. संस्थेचे कार्यक्षम कार्यकारी मंडळ, सन्माननीय सल्लागार, विविध समित्यांच्या माध्यमातून काम करणारे सेवाभावी कार्यकर्ते, संस्थेचा निष्ठावंत सेवक वर्ग, कामगार-कर्मचारी, श्री लक्ष्मी कॅटरर्स या सर्वांनीच आपली निष्ठा व बांधिलकी उत्तम प्रकारे जपली आहे.

विद्यमान कार्यकारी मंडळाचा अजून दोन आर्थिक वर्षांचा कार्यकाळ बाकी आहे. अहवाल साली कार्यकारी मंडळाने केलेल्या कामकाजाचा विस्तृत अहवाल व जमाखर्च पत्रके या अहवाल पुस्तिकेच्या माध्यमातून आपणासमोर सादर करण्यात आली आहेत. कोरोना महामारीच्या काळात संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत डबघाईला आली होती. संस्थेच्या सेवक व कामगार वर्गाने त्या काळात खरोखरच फार मोलाचे सहकार्य करुन मोठा आधार दिला होता, याची जाणीव आम्हा सर्वांना निश्चितच आहे. माहे मे २०२० मध्ये तत्कालिन कार्यकारी मंडळाने केलेल्या बीनव्याजी ठेव योजनेला मंडळाच्या निष्ठावंत सभासदानी अत्यंत मोलाचा प्रतिसाद दिला होता. सुमारे ८४ सभासदांनी, ज्या मध्ये सर्व कार्यकारिणी सदस्यांचा शंभर टक्के सहभाग होता, या योजनेद्वारे सुमारे सोळा लाख रुपयांच्या बीन व्याजी ठेवी संस्थेकडे जमा झाल्या. कार्यकारी मंडळाने केलेल्या करारानुसार तीन वर्षांची मुदत संपताच या ठेवी परत करण्याची प्रक्रीया सुरु झाली. अहवाल साली यातील पन्नास टक्के रक्कम ठेवीदाराना परत करण्यात आली असून उर्वरित रक्कम माहे डिसेंबर २०२४ पर्यंत त्यांच्या मुदतीनुसार परत करण्याची व्यवस्था कार्यकारी मंडळाने केली आहे. कठीण आर्थिक काळात अशा प्रकारे सहकार्याचा हात पुढे करणारे सभासद ही संस्थेची मोठी श्रीमंती आहे.

अहवाल सालात कार्यकारी मंडळाने, सौर उर्जा प्रकल्प पूर्ण केला असून वीज बीलामध्ये बऱ्यापैकी घट होत आहे. या वर्षी कार्यकारी मंडळाने आपल्या इमारतीमध्ये स्वयंपाकघर तयार करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यासाठी इमारतीचा सुधारित आराखडा तयार करुन तो महानगरपालिकेला सादर केला. महानगरपालिका व वास्तू विशारदांच्या सूचनांनुसार इमारतीमध्ये काही मोठी खर्चिक कामे करणे अनिवार्य ठरली. त्या प्रमाणे तळमजल्यावर प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला स्वयंपाकघर, सुधारित आराखड्यानुसार तळमजला, पहिला मजला व तिसऱ्या मजल्यावरील प्रसाधन गृहाची नव्याने बांधणी, काही अन्य आवश्यक दुरुस्त्या इ. साठी फार मोठा खर्च करावा लागला. काही कामे पूर्ण झाली असून काही कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. सौर उर्जा, स्वयंपाकघर, प्रसाधन गृहे इ. मोठ्या कामांसाठी वर्षभरात सुमारे ५५ ते ६० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. बऱ्याच अंशी ही कामे कार्यकारी मंडळाने पूर्ण केली आहेत. मंडळाची एकूण अर्थिक स्थिती, उर्वरित अत्यावश्यक कामे इ. च्या पूर्ततेसाठी आर्थिक सहकार्याची, देणग्यांची नितांत आवश्यकता आहे. या साठी मंडळाच्या सभासदांकडून सक्रिय सहकार्याची अपेक्षा आहे.

आपणा सर्वांच्या बहुमोल सहकार्याने, मार्गदर्शनाने, मंगल शुभाशीर्वादाने चाललेली संस्थेची यशस्वी वाटचाल अशीच प्रगतीपथावर ठेवू या, अशी सदिच्छा व्यक्त करतो. श्री देवी तुळजाभवानी मातेच्या चरणी प्रार्थना करुन मी माझे अध्यक्षीय मनोगत पूर्ण करतो !

**सर्वाना नमस्कार ! धन्यवाद !**

**श्री. रमेश र. शिर्के**

अध्यक्ष

मराठा मंडळ मुलुंड, मुंबई

# मराठा मंडळ मुलुंड, मुंबई

[नोंदणी क्र.: एफ् ५५५१ (मुंबई)]

## पंचेचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

श्री./श्रीमती ______________________________________________ यांस

स.न.वि.वि.

मंडळाची पंचेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार** दिनांक **०४ /०८ /२०२४** रोजी संध्याकाळी **४.३०** वाजता, चंद्रकांत गणपत देसाई सभागृह, मराठा मंडळ मुलुंड, मुंबई - सांस्कृतिक केंद्र इमारत, वा. ब. फडके मार्ग, वसंतराव सकपाळ चौक, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१ येथे मंडळाचे अध्यक्ष **श्री. रमेश र. शिर्के** यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. मंडळाच्या सर्व सभासदांनी या सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**-: सभेपुढील कामकाज :-**

१. मागील दि. २७/०८/२०२३ रोजी झालेल्या चव्वेचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.

२. इ.स. २०२३-२४ या कार्यवर्षाचा वार्षिक अहवाल स्वीकृत करुन त्यास मंजूरी देणे.

३. इ.स. २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापालांनी तपासलेले हिशेब व ताळेबंद यांस मंजूरी देणे.

४. इ.स. २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

५. इ.स. २०२४-२५ या वर्षाकरिता सनदी लेखापालांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.

६. इ.स. २०२४-२५ या वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे.

७. सभासदांकडून आलेले किंवा कार्यकारी मंडळाने मांडलेले ठराव व केलेल्या सूचना यावर विचार-विनिमय करुन आवश्यक ते निर्णय घेणे.

८. सांस्कृतिक केंद्र इमारतीमधील सेवा-सुविधा यांची माहिती देणे व पुढील योजना, संकल्पना यावर विचार करणे.

९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी अन्य कामे

१०. अध्यक्षीय समारोप

११. आभार प्रदर्शन

मुलुंड, मुंबई

दिनांक : २७/०६ /२०२४

**कार्यकारी मंडळाच्या अनुज्ञेने**

**अजय सि. खामकर**

सरचिटणीस

**(सभेसंबंधीच्या विशेष सूचना पुढील पानावर पहा)**

## –: विशेष सूचना :-

☞ गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब करावी लागल्यास अशी तहकूब झालेली **सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी** सभेच्या नियोजित वेळेपासून **अर्ध्या तासाने** घेण्यात येईल. या सभेस **गणसंख्येचे बंधन रहाणार नाही.**

☞ ज्या सभासदाना अहवाल पुस्तिकेची प्रत हवी असेल त्यानी या पुस्तकेतील सूचनेप्रमाणे मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधून अहवाल पुस्तिकेची प्रत मिळवावी व त्यानंतर ज्या सभासदांना अहवाल व जमाखर्च यासंबंधी माहिती अगर प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी ते लेखी स्वरुपात दिनांक **३० / ०७ /२०२४** पर्यंत मंडळाकडे आणून द्यावेत, आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे, त्यासंबंधीची माहिती उपलब्ध असल्यासच देण्यात येतील. प्राप्त झालेल्या लेखी पत्रानुसार अथवा काही सभासदांना समक्ष उपस्थित राहून अधिक माहिती हवी असेल, अशा सभासदांनी दि. **३०/०७/२०२४** ते **दि. ०२ /०८/२०२४** या कालावधीत दररोज संध्याकाळी **६.०० ते ८.००** या वेळात मंडळाच्या कार्यालयात उपस्थित राहून मंडळाचे कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष किंवा सरचिटणीस यांचेशी संपर्क साधून अपेक्षित माहिती घ्यावी. जेणे करुन वार्षिक सर्वसाधारण सभेचा अधिक वेळ जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

☞ गतवर्षीच्या चव्वेचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत मंडळाच्या कार्यालयात दि. **२३/०७ /२०२४** ते दि. **०३ /०८ /२०२४** पर्यंत दररोज **सकाळी ११ ते दुपारी १ व संध्याकाळी ४ ते ७** या वेळात सभासदांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे. तरी संबंधित इच्छुकांना सदर वृत्तांत वरील निर्धारित वेळेत पहाता येईल.

☞ ज्या सभासदांना काही ठराव अगर सूचना मांडायच्या असतील तर त्या त्यांनी सूचक व अनुमोदक यांची संपूर्ण नावे व सह्यानिशी लेखी स्वरुपात दि. **३० /०७ /२०२४** पर्यंत मंडळाकडे आणून देणे. सभेला येताना ज्यांच्याकडे अहवाल पुस्तिका असेल, त्यानी ती सोबत घेऊन येणे. ज्यांच्याकडे अहवाल पुस्तिका नसेल त्यांना ती सभास्थळी देण्यात येईल.

☞ ज्या सभासदांचा पत्ता बदलला असेल तसेच ज्या सभासदांनी अद्याप आपले **ओळख पत्र** बनवून घेतले नसेल, अशा सभासदांनी कार्यालयात संपर्क साधावा.

☞ सभासदांनी आपले दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक / ई-मेल आयडी दिले नसल्यास किंवा बदलले असल्यास, त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधून नोंद / दुरुस्ती करावी. भविष्यात होणाऱ्या कार्यक्रम व उपक्रमाचे निमंत्रण आपणास ई-मेल व व्हाटस्ॲप वरुन देण्यात येईल.

## अहवाल व जमाखर्च या संबंधी संपर्कासाठी भ्रमणध्वनी

| | | |
|---|---|---|
| सरचिटणीस : | श्री. अजय सिताराम खामकर | मो. ९८२०६५९९०० |
| कोषाध्यक्ष : | श्री. वसंत सखारामराव भोसले | मो. ९८६७३००६२५ |
| कोषाध्यक्ष : | श्री. ज्ञानेश्वर नारायण भालेराव | मो. ९८६९४४०७०७ |

## अहवाल पुस्तिकांसंबधी महत्वाचे निवेदन

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निर्देशानुसार अहवाल पुस्तिकेच्या मर्यादित प्रती छापण्यात आल्या आहेत. सदर पुस्तिकेत कार्यवर्षाचा अहवाल व जमाखर्च पत्रके यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्या सभासदांना अहवाल पुस्तिकेची प्रत हवी असेल त्यांनी त्यासाठी दिनांक २० /०७ /२०२४ ते ०२/०८/२०२४ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी १ व संध्याकाळी ४ ते ७ या वेळात कार्यालयात संपर्क साधून अहवाल प्रत मिळवावी. वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित रहाणाऱ्या सभासदांपैकी ज्यांच्याकडे छापिल पुस्तिका नसेल त्यांना ती सभास्थळी देण्यात येईल. अहवाल पुस्तिका संस्थेच्या **वेब** साईटवर उपलब्ध आहे.

**- सरचिटणीस**

## मराठा मंडळ मुलुंड, मुंबई
## दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कार्यवर्षाचा
## :- वार्षिक अहवाल : -

सन्माननिय सभासद, बंधू-भगिनींनो, सविनय प्रणाम

दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या मंडळाच्या चव्वेचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत इ. स. २०२३/२४ ते इ. स. २०२५/२६ या तीन वर्षाकरिता नविन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या कार्यकारी मंडळाने अधिकारावर आल्यानंतर सुमारे सात महिन्यांच्या कालावधित आपले पहिले आर्थिक वर्ष दिनांक ३१ मार्च रोजी पूर्ण केले. या इ. स. २०२३/२४ या आर्थिक वर्षाचा, कामकाजाचा सविस्तर अहवाल, आर्थिक आय-व्यय, जमाखर्च पत्रके, वर्षभरात झालेले भरगच्च कार्यक्रम, अंगीकृत उपक्रम, समारंभ, योजना, संकल्पना, मंडळाच्या देखण्या वास्तूची जोपासना इ. आपणासमोर या अहवाल पुस्तिकेच्या माध्यमातून सादर करताना कार्यकारी मंडळास कर्तव्य पूर्तीचे समाधान व आनंद वाटत आहे.

सध्याची सामाजिक, सांस्कृतिक व अन्य क्षेत्रातील मरगळलेली अवस्था व एकूणच आर्थिक उत्पन्नाची घटलेली परिस्थिती यामुळे मंडळाचा कारभार चालविणे बऱ्याच अंशी खडतर झाले आहे. मात्र तरीही मंडळाच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत म्हणजे सभागृहे आरक्षण, कॅटरिंग रॉयल्टी, वधू-वर सूचक मंडळाला मिळणारा वाढता प्रतिसाद, आपल्या सांस्कृतिक केंद्र इमारतीमध्ये चालणारे विविध वर्ग, विद्यार्थी अभ्यासिका इ. च्या माध्यमातून मंडळाला मिळणाऱ्या आर्थिक सहयोगा मुळेच हा जगन्नाथाचा रथ प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. कार्यकर्त्यांचा वाढता उत्साह, महिला आघाडीच्या माध्यमातून होणारे अनेक उपक्रम, महिलांच्या अथक परिश्रमामुळे ग्राहक पेठे सारख्या उद्योगातून मंडळाला चांगल्यापैकी आर्थिक हातभार मिळतो. मंडळाच्या कार्याची व्याप्ती, जनमानसातील आदराचे स्थान आपल्या विद्यमान कार्यकारी मंडळाने निश्चितच अबाधित राखले आहे. याचा आपणा सर्वांनाच रास्त असा अभिमान वाटावा!

अहवालसाली मंडळाचे मुख्य कार्यकारी मंडळ, सन्माननीय सल्लागार, विविध समित्या इ. च्या माध्यमातून मंडळाची देखणी वास्तू सततचे कार्यक्रम, समारंभ, विवाह-वाढदिवस सोहळे इ. मुळे सदैव गजबलेली असते. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, विविध समित्यांचे प्रमुख / निमंत्रक, सदस्य, सेवक वर्ग या सर्वांच्या परस्पर सहकार्याने, समन्वयाने, प्रेमळ संवादाने मंडळाचे दैनंदिन कामकाज खरोखरच उत्तम प्रकारे चालले आहे.

आदरणीय सल्लागारांचे समयोचित मार्गदर्शन व मंडळाच्या कामकाजावरील देख-रेख, तसेच आवश्यक त्या सूचना व सल्लामसलत यामुळे मंडळाचे कामकाज प्रगतीपथावर राहीले आहे. मंडळाचा कार्यालयीन सेवक वर्ग,सुरक्षा रक्षक, हाऊसकिपिंग कर्मचारी, कॅटरिंग ठेकेदार मे. लक्ष्मी कॅटरर्स, त्यांचा सेवक वर्ग, विविध कामांचे कंत्राटदार या सर्वांच्या सहकार्यामुळे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचा हा सेवाभावी रथ सदैव सन्मानपूर्वक वाटचाल करीत आहे. अहवाल सालाचा कार्यकारी मंडळाचा हा विस्तृत अहवाल व सर्व परिपूर्ण जमाखर्च पत्रके आपणासमोर सादर करताना कार्यकारी मंडळाला मनापासून आनंद व समाधान वाटत आहे.

## मंडळाच्या विविध सभा - बैठका

मंडळाची चव्वेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७/०८/२०२३ रोजी मंडळाचे अध्यक्ष श्री. रमेश र. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आपल्या सांस्कृतिक केंद्र इमारतीतील चंद्रकांत गणपत देसाई सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेला एकूण **१३१** सभासद उपस्थित होते. या सभेचे सर्व नियोजित कामकाज उपस्थितांच्या सहभागाने उत्तम प्रकारे पार पडले. मंडळाच्या कामकाज विषयक विविध समित्यांच्या सुध्दा आवश्यकतेनुसार नियमितपणे सभा-बैठका घेण्यात आल्या. या सर्व सभांना त्या त्या समिती सदस्यांचा उत्तम सहभाग व उपस्थिती लाभली होती. मंडळाचे कार्यकारी मंडळ, विविध समित्या, सल्लागार मंडळ या सर्वांच्या परस्पर सहभागाने, सहकार्याने व समन्वयाने मंडळाचे कामकाज सुयोग्य प्रकारे प्रगतीपथावर आहे.

दि. ०१ एप्रिल २०२३ ते ०१ सप्टेंबर २०२३ या कार्यवर्षाच्या कालावधीत तत्कालीन कार्यकारी मंडळाच्या **एकूण ६** सभा झाल्या. या सर्व सभांना सदर कार्यकारिणी सदस्यांची उपस्थिती पुढील प्रमाणे होती.

| पदाधिकारी | | | कार्यकारिणी सदस्य | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. रमेश रघुनाथ शिर्के | अध्यक्ष | ५ | श्री. संतोष परशुराम सावंत | का. सदस्य | ६ |
| श्री. अरुण विठ्ठल चव्हाण | उपाध्यक्ष | ४ | श्री. दिगंबर दत्तात्रय राणे | का. सदस्य | ५ |
| श्री. महेश श्रीकृष्ण चव्हाण | कार्याध्यक्ष | ५ | सौ. रश्मी (आशा) गणेश राणे | का. सदस्य | ५ |
| श्री. अजय सिताराम खामकर | सरचिटणीस | ६ | श्री. रमेश लक्ष्मणराव शिंदे | का. सदस्य | २ |
| श्री. राजन गोपाळराव भोसले | सहचिटणीस | ३ | सौ. माधुरी मारुती तळेकर | का. सदस्य | ४ |
| श्री. शिवाजी जगन्नाथ सावंत | सहचिटणीस | ४ | श्री. ज्ञानेश्वर नारायण भालेराव | का. सदस्य | ५ |
| श्री. प्रमोद द्वारकानाथ देसाई | कोषाध्यक्ष | ६ | सौ. ऐश्वर्या रविंद्र ब्रीद | का. सदस्य | ५ |
| श्री. वसंत सखारामराव भोसले | कोषाध्यक्ष | ४ | श्री. अजय बळीराम माने | का. सदस्य | ६ |

मंडळाचे विद्यमान कार्यकारी मंडळ दि. ०१ / ०९ / २०२३ पासून कार्यरत झाले आहे. त्यामुळे या कार्यकारी मंडळास या आर्थिक वर्षातील केवळ सात महिन्यांचा कालावधी लाभला. या कालावधीत म्हणजेच दि. ०१ /०९/२०२३ ते ३१/०३/२०२४ पर्यंत कार्यकारी मंडळाच्या कार्यवर्षाच्या कालावधीत **एकूण ७** सभा झाल्या. या सर्व सभांना कार्यकारीणी सदस्यांची उपस्थिती पुढीलप्रमाणे होती.

| पदाधिकारी | | | कार्यकारिणी सदस्य | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. रमेश रघुनाथ शिर्के | अध्यक्ष | ७ | श्री. राजन गोपाळराव भोसले | का. सदस्य | ७ |
| श्री. अरुण विठ्ठल चव्हाण | उपाध्यक्ष | ६ | श्री. प्रमोद द्वारकानाथ देसाई | का. सदस्य | ७ |
| श्री. शिवाजी जगन्नाथ सावंत | उपाध्यक्ष | ५ | सौ. रश्मी (आशा) गणेश राणे | का. सदस्य | ५ |
| श्री. महेश श्रीकृष्ण चव्हाण | कार्याध्यक्ष | ५ | सौ माधुरी मारुती तळेकर | का. सदस्य | ७ |
| श्री. अजय सिताराम खामकर | सरचिटणीस | ६ | श्री. अजय बळीराम माने | का. सदस्य | ६ |
| श्री. दिगंबर दत्तात्रय राणे | सहचिटणीस | ६ | श्री. शंकर शांताराम दळवी | का. सदस्य | ४ |
| सौ. ऐश्वर्या रविंद्र ब्रीद | सहचिटणीस | ६ | श्री. उदय मनोहर दरेकर | का. सदस्य | ५ |
| श्री. वसंत सखारामराव भोसले | कोषाध्यक्ष | ७ | श्री. प्रसाद अजित साळवी | का. सदस्य | ४ |
| श्री. ज्ञानेश्वर नारायण भालेराव | कोषाध्यक्ष | ७ | | | |

## सल्लागार मंडळ

इ.स. २०२१-२२ ते इ. स. २०२५ -२६ या पाच वर्षाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागार मंडळात अहवालसाली दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ पर्यंत सल्लागार मंडळाच्या स्वतंत्र व संयुक्त अशा **एकूण ४** सभा झाल्या. सदर सभांना सल्लागारांची उपस्थिती पुढीलप्रमाणे होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. सुरेश गेनभाऊ डुंबरे | निमंत्रक | ४ | श्री. नंदकुमार यशवंत माने | सल्लागार | ३ |
| श्री. संजय केशव आयरे | सल्लागार | ४ | श्री. सुदाम चंद्रू म्हामूणकर | सल्लागार | ४ |
| सौ. चित्रा अरुण धुरी | सल्लागार | ४ | | | |

## ३१ मार्च २०२४ अखेर मंडळाच्या सभासद संख्येचा तपशील

| सभासद वर्ग | ३१ मार्च २०२३ अखेर एकूण नोंदलेले सभासद | अहवालसाली नविन सभासद | एकूण सभासद | सभासदत्व रद्द | ३१ मार्च २०२४ अखेर एकूण सभासद |
|---|---|---|---|---|---|
| आधारस्तंभ | ०१ | | ०१ | - | ०१ |
| आश्रयदाता | ११ | - | ११ | ५ | ०६ |
| हितचिंतक | १२ | ०१ | १३ | २ | ११ |
| तहहयात | २०१४ | १६ | २०३० | ३१० | १७२० |
| एकूण | २०३८ | १७ | २०५५ | ३१७ | १७३८ |

## अहवाल साली नोंदण्यात आलेले नविन सभासद

### तहहयात सभासद : २०२३ - २४

कु. आर्या महेश चव्हाण
सौ. प्रियांका वैभव खामकर
श्री. सुनिल भगवान परब
सौ. नेहा ज्ञानदेव मोहिते
श्री. गणेश चंद्रकांत शेलार
श्री. किशोरकुमार भाऊराव नाईक - साटम
श्री. विजयानंद मधुसूदन राणे
सौ. नम्रता विश्वास राणे
सौ. शिल्पा विवेक घुले
श्री. अनिकेत मधुकर सुर्वे
श्री. विजय रामकृष्ण मोढे
श्री. अच्युत निळकंठ साळुंके
श्री. सतिश राजाराम मोरे
श्री. दिलीप यशवंत दळवी
श्री. विलास विष्णू दळवी
श्रीमती रजनी श्रीधर सावंत

**हितचिंतक सभासद :** श्री. गोपाळ नारायण उतेकर

## अहवाल सालातील दिवंगत सभासद : २०२३ - २०२४

अहवालसाली सुधा शंकर कदम, राजेंद्र शांताराम कदम, प्रभाकर पुरुषोत्तम पाताडे, नितीन चंद्रकांत देसाई, दत्ताराम महादेव लोटणकर, काशिनाथ सिताराम पवार, विष्णू रामचंद्र दळवी, मोहन आत्माराम राणे, अरुण नारायण आयरे, शशिकांत गणपत भोगले या सभासदांचे निधन झाले असून कार्यकारी मंडळाने या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. वरील तपशीलामध्ये दि. ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत घटनात्मक दृष्ट्या सभासदत्व रद्द झालेल्या सर्व सभासदांची नोंद घेऊन सदर तपशील परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## शिक्षण फंड देणगीदार - २०२३-२०२४

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती रमाली राजेंद्र शिंगरे ( कै. राजेंद्र विठ्ठल शिंगरे यांच्या स्मृतिपित्यर्थ) | २५०००.०० | ०० |
| २) | श्रीमती राजश्री मनोहर सावंत | २५०००.०० | ०० |
| ३) | डॉ. अरुण विष्णू धुरी | २५०००.०० | ०० |
| ४) | श्रीमती नंदा रघुनाथ सावंत (कै. रघुनाथ आत्माराम सावंत यांच्या स्मरणार्थ) | ११०००.०० | ०० |
| ५) | सौ. श्रावणी सचिन माने ( कै. बळीराम शांताराम माने यांच्या स्मरणार्थ) | १००००.०० | ०० |
| ६) | श्री. सचिन बळीराम माने ( कै. सौ. शारदा बळीराम माने यांच्या स्मरणार्थ) | १००००.०० | ०० |
| ७) | सौ. मयुरी मंगेश सावंत ( कै. बळीराम शांताराम माने व कै. सौ. शारदा बळीराम माने यांच्या स्मरणार्थ ) | १००००.०० | ०० |
| ८) | श्री. श्यामसुंदर विष्णू परब ( कै. विष्णू रामचंद्र परब व गं. भा. सरस्वती विष्णू परब यांच्या स्मरणार्थ) | १००००.०० | ०० |
| ९) | कु. मानसी अजय खामकर | ५०००.०० | ०० |
| | **एकूण :** | १,३१,००० | ०० |

## ३१ मार्च २०२४ अखेर शिक्षण फंड

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षण फंड क्रमांक - ०१ | ४४,०८० | शिक्षण फंड क्रमांक - ०२ | ३,१२,३५२ |
| अहवालसाली जमा | ०० | अहवालसाली जमा | १,३१,००० |
| **एकूण:** | **४४,०८०** | **एकूण:** | **४,४३,३५२** |

## सन्माननीय देणगीदार : २०२३ - २०२४

| अनुक्रमांक | देणगीदाराचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | श्रीमती मधुरा सुधीर महंत | ५०,०००.०० |
| २ | अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुलुंड शाखा | १०,०००.०० |
| ३ | श्री. प्रसाद अजित साळवी | १०,०००.०० |
| ४ | श्री. सतिश कृष्णराव शिंदे (कै. श्री. कृष्णराव गंगाधर शिंदे यांच्या स्मृत्यर्थ) | ५००१.०० |
| ५ | श्री. सतिश कृष्णराव शिंदे (कै. श्रीमती राधाबाई कृष्णराव शिंदे यांच्या स्मृत्यर्थ) | ५००१.०० |
| ६ | श्री. सतिश कृष्णराव शिंदे (कै. श्रीमती काशीबाई भीमराव शिंदे यांच्या स्मृत्यर्थ) | ५००१.०० |
| ७ | श्री. महेश श्रीकृष्ण चव्हाण | ५०००.०० |
| ८ | श्री. सोनाली संदिप कदम | ५०००.०० |
| ९ | श्री. सायली सत्यवान दळवी | ५०००.०० |
| १० | श्री. चैतन्य जनार्दन सावंत | ५०००.०० |
| ११ | श्री. शरयू सुधीर सावंत | ५०००.०० |
| १२ | श्री. एस. बी. आय. स्टाफ कविता को. ऑपराटिव्ह हौसिंग सोसायटी मर्या | २५००.०० |
| १३ | श्री. प्रतिक शाह | २५००.०० |
| १४ | श्री. पद्मनाथ जयप्रकाश राणे | २०००.०० |
| १५ | कु. मानसी नरेश शिर्के | २०००.०० |
| १६ | श्री. अपर्णा अशोक खानविलकर | १५००.०० |
| | **एकूण** | **१२०५०३.००** |

# बिनव्याजी ठेव योजना

सन २०२० पासून करोना काळात उद्भवलेल्या आर्थिक विवंचनेतून बाहेर पडण्यासाठी मंडळाच्या व्यवस्थापनाने आपल्या सभासदांना किमान रु. १००००/- (रुपये दहा हजार फक्त) किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम तीन वर्षाकरीता बिनव्याजी ठेव ठेवण्यासाठी कळकळीचे आवाहन केले होते. या आवाहनाला सभासदांनी विशेषतः कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य, सल्लागार यांनी चांगला प्रतिसाद दिला. **दि. २५/०५/२०२० ते दि. २३/१२/२०२१ या कालावधित ८४ सदस्यांनी एकूण रु. १६,०२,०००/- (सोळा लाख दोन हजार फक्त )** इतकी रक्कम तीन वर्षाकरिता मंडळाकडे बिनव्याजी ठेव म्हणून ठेवली होती. या काळात या रक्कमेवरील व्याज हे मंडळाचे उत्पन्नाचे स्त्रोत होते, ज्याची मंडळाला निश्चितच आर्थिक मदत झाली. ठरल्याप्रमाणे तीन वर्ष मुदत पूर्ततेनंतर प्रत्येक ठेवीदारास त्याची मुद्दल रक्कम परत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. **३१ मार्च २०२४ पर्यंत रु. ८,०७,०००/- (आठ लाख सात हजार फक्त )** इतकी मूळ रक्कम परत करण्यात आली आहे. या पैकी श्री. सुरेश गेनभाऊ डुंबरे यांनी **रु.२००००/-** व श्री प्रसाद अजित साळवी यानी **रु. १००००/-** ही रक्कम परत घेऊन ती मंडळाला देणगी म्हणून दिली आहे. उर्वरीत ठेवीदारांची एकूण रक्कम **रु. ७,९५,००० /- ( सात लाख पंच्याण्णव हजार फक्त )** माहे **डिसेंबर २०२४** पर्यंत पूर्ण परत करण्यात येणार आहे. सर्व बिनव्याजी ठेवीदाराना मन:पूर्वक धन्यवाद व त्यांचे आभार!



# अहवालसाली मंडळाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम, उपक्रम, समारंभ यांचा तपशील

## साहित्य सम्राट आचार्य अत्रे १२५ वी जयंती सोहळा

शनिवार दि. १२ ऑगस्ट आणि रविवार १३ ऑगस्ट २०२३ असे २ दिवस, साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांचा १२५ वा जयंती सोहळा मोठ्या आनंदात, उत्साहात व प्रचंड उपस्थित साजरा झाला.

दिनांक १२ ऑगस्टच्या कार्यक्रमाचे महनीय वक्ते **मा. मधुकरराव भावे** यांचे व्याख्यान श्रवणीय आणि सौ. दिपाली केळकर यांचे ओघवते सूत्रसंचालन/निवेदन अप्रतिम होते. १३ ऑगस्ट रोजी स्थानिक कलाकारांनी सादर केलेला **"अष्टपैलू अत्रे "** हा देखणा सांस्कृतिक कार्यक्रम संस्मरणीय ठरला. यासाठी अतोनात परिश्रम करणारे संतोष सावंत, निलेश सुर्वे, उदय दरेकर, आत्माराम मोरे, हेमंत भोगले, अजय खामकर, विषयानुरुप रांगोळी साकारणारी सौ. ऐश्वर्या ब्रीद आणि मंडळातील तसेच बाहेरील कलाकार, विशेषतः विघ्नेश जोशी या सर्वांचे अनमोल सहकार्य, सहभाग आणि प्रसंगी मार्गदर्शन यामुळे हा कार्यक्रम खरोखरच लाजबाब झाला. अनेक कलाकारांची मोट बांधून इतका सुंदर कार्यक्रम मराठा मंडळात दोन दिवस साजरा झाला. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. महेश चव्हाण हे सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी होते.

## मंडळाचा वर्धापनदिन सोहळा - कोजागिरी पौर्णिमा

कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर स्थापन झालेल्या आपल्या मराठा मंडळाचा **४५ वा वर्धापन दिन** तिथी प्रमाणे कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर २०२३ रोजी उत्साहात साजरा झाला. सकाळच्या सत्रात मंडळाचे उपाध्यक्ष श्री.शिवाजी सावंत व सौ. रेश्मा सावंत या दांपत्याच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व पदाधिकारी, समिती सदस्य, सभासद यानी तीर्थ प्रसादाचा लाभ घेतला.

सर्वांना ऋषितुल्य आणि सर्वांच्या खांद्यावर आश्वासक हात ठेवून मार्गदर्शन करणारे **मा. श्री. कृ. बा. शिर्के** आणि **मा.श्री. अरविंद राणे** यांचा व्यासपीठावरील सन्मान तसेच मंडळासाठी बहुमूल्य योगदान देणारे, मंडळाच्या आर्थिक अडचणीत वेळोवेळी सहकार्य करणारे श्री. लक्ष्मी कॅटरर्सचे मा. श्री. चंद्रशेखर चाळके व सौ. शामल चाळके, मंडळासाठी योगदान देणारे ज्येष्ठ सभासद श्री. प्रभाकर यशवंतराव यांचा सन्मान हा या वर्धापनदिन सोहळ्याचा परमोच्च आनंदाचा भाग होता. मंडळाचे कर्मचारी श्री. सहदेव परब व राजेश धुर्वे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा बद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. सांस्कृतिक विभागप्रमुख सौ. रश्मी राणे यांचा, त्यांच्या योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. या सोहळ्यातील मराठा मंडळ कलामंच प्रस्तुत **...हे सुरांनो चंद्र व्हा...** हा करमणुकीचा कार्यक्रम, श्री. हेमंत भोगले यांनी साकार केलेल्या चांद्रयान उड्डाणाच्या देखण्या चलत्चित्राच्या देखाव्याने सुरु झाला. चंद्राच्या विविध रुपांना गायन आणि नृत्यातून सादर करत सर्व कलाकारांनी आनंदाची पर्वणी देत कार्यक्रम छानपणे संपन्न केला. सौ. सोनाली सावंत, सौ. शुभदा म्हामुणकर यांचे सूत्रसंचालन लालित्यपूर्ण होते. अशा प्रकारे मंडळाच्या कलामंचने एकजुटीने, एकोप्याने वर्धापनदिन सोहळा आनंदमय केला.

## मंडळाचे ४५ वे वार्षिक स्नेहसंमेलन

आपल्या मंडळाचे ४५ वे वार्षिक स्नेहसंमेलन रविवार दि. २८ जानेवारी २०२४ रोजी मंडळाच्या वास्तूत मोठया दिमाखाने साजरे झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाच्या सभासद कलाकारांनी सादर केलेल्या **रामा रघुनंदना** या प्रभू रामचंद्राचे गुणगान करणाऱ्या भक्ती गीतांच्या कार्यक्रमातून सभासदांच्या कलागुणांचे मनोज्ञ दर्शन झाले. व्यासपीठावरील विद्यार्थी पारितोषिक वितरण आणि गुण - गौरव समारंभाचे संगीता लाड यांचे निवेदन, मंडळाचे सरचिटणीस श्री. अजयजी खामकर यांचे समयोचित प्रास्ताविक आणि संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वाखाणण्याजोगे होते. मा. कार्याध्यक्ष श्री. महेशजी चव्हाण यांचे विश्लेषण, मंडळाच्या भावी वाटचालीची झलक उपस्थितांना चांगलीच भावली !

प्रवेशद्वारावरील सौ. ऐश्वर्या ब्रीद यांनी काढलेली चित्तवेधक रांगोळी नयनरम्य तसेच विषयांचे दर्शन घडविणारी होती. समारंभाचे प्रमुख पाहुणे **मा. डॉ. अरुण धुरी** यांचे मार्गदर्शन हे केवळ विद्यार्थीवर्गा साठीच नव्हे तर पालकांसाठी सुध्दा बोधामृत होते. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष निर्भीड आणि व्यासंगी पत्रकार **मा. श्री. नरेंद्र वाबळे** साहेबांचे भाषण सुध्दा श्रवणीय व विचार प्रवर्तक होते.संपूर्ण कार्यक्रमात अभेद्य ऐक्य परस्पर आदरभाव आणि स्नेहाचे वातावरण अनुभवयास मिळाले. सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. रश्मी राणे व निमंत्रक सौ. करुणा सावंत यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे उत्तम आयोजन - नियोजन केले होते.

## शैक्षणिक पारितोषिके : २०२३

### माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता दहावी) मार्च २०२३

### प्रथम क्रमांक

### कु. साईश सतीश राणे ४५१/५०० (९०.०२%) (CBSE)

☞ कै. इंदिरा रघुनाथ सकपाळ पारितोषिक पुरस्कृत श्री. अरविंद रघुनाथ सकपाळ आणि श्री. वसंतराव सकपाळ

☞ नाटककार कै.ला.कृ. आयरे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. राजाराम सूर्याजी खामकर

☞ कै.सौ. शेवंतीबाई पांडुरंग शिंदे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. दिनेश बबन शिंदे

☞ कै.सौ. सरस्वती लक्ष्मण शिंदे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. रमेश लक्ष्मणराव शिंदे

**गणित विषयात सर्वप्रथम** (१०० पैकी ८७)

**कु. साईश सतीश राणे**

☞ कै.सौ. सुमित्राबाई भाऊराव देसाई स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. रमेश भाऊराव देसाई

☞ कै. शिवराम नारायण चव्हाण स्मृती पारितोषिक पुरस्कर्त्या सौ. प्रतिभा प्रभाकर पाताडे

**मराठी विषयात प्रथम क्रमांक कु. साईश सतीश राणे (१०० पैकी ९३ )**

☞ कै. सौ. मृणिला कृष्णकांत तावडे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. कृष्णकांत तावडे

☞ कै. सौ. रुपाली भूषण रेडकर स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. भिकाजी तुकाराम सावंत

☞ कै. रमाबाई पुरुषोत्तम पाताडे स्मृती पारितोषिक पुरस्कृत सौ. प्रतिभा प्रभाकर पाताडे

☞ कै. पार्वतीबाई महादेव लोटणकर स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. दत्ताराम महादेव लोटणकर

☞ कै. कु. दर्शना अशोक सावंत स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. अशोक गजानन सावंत

**माध्यमिक शालांत परीक्षा ( इयत्ता दहावी ) द्वितीय क्रमांक**

**कु. ओंम महेन्द्रकुमार गायकवाड ३८८/५०० (७७.६०%) (MUMBAI BOARD)**

☞ कै.सौ. सरस्वती लक्ष्मण शिंदे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. रमेश लक्ष्मणराव शिंदे

**माध्यमिक शालांत परीक्षा ( इयत्ता दहावी ) मार्च २०२३ (७५% हुन अधिक गुण प्राप्त विद्यार्थी)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कु. साईश सतीश राणे | ५०० | ४५१ | ९०.०२ |
| २ | कु. ओंम महेन्द्रकुमार गायकवाड | ५०० | ३८८ | ७७.६० |
| ३ | कु. अथर्व प्रदिप सावंत | ५०० | ३७० | ७४.०० |

**उच्च माध्यमिक परीक्षा (इयत्ता बारावी)**

**प्रथम क्रमांक कु. अर्थव मनोज लोटणकर (५४२/६०० (९०.३३ % )**

☞ कै.सौ. सरस्वती लक्ष्मण शिंदे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. रमेश लक्ष्मणराव शिंदे

☞ मंडळाचे माजी अध्यक्ष कै. वसंतराव सकपाळ स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. अरविंद सकपाळ आणि श्री. मनोज सकपाळ

**उच्च माध्यमिक परीक्षा भौतिक व रसायनशास्त्र विषयात प्रथम क्रमांक :**

**कु. अर्थव मनोज लोटणकर (भौतिकशास्त्र ९६/१०० रसायनशास्त्र ८८/१००)**

☞ कै. लक्ष्मण अर्जुन तावडे स्मृती पारितोषिक पुरस्कृत सौ. प्रज्ञा अरविंद राणे

**कु. सानिका सुनिल सावंत (५१८/६०० (८६.३३) टक्के)**

☞ कै. सौ. सरस्वती लक्ष्मण शिंदे स्मृती पारितोषिक पुरस्कृत श्री. रमेश लक्ष्मण शिंदे

**उच्च माध्यमिक परीक्षा (इयत्ता बारावी) (७० % हून अधिक गुण प्राप्त विद्यार्थी)**

| अनु. | वर्ग | नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कला | कु. अर्थव मनोज लोटणकर | ६०० | ५४२ | ९०.३३ |
| ०२ | वाणिज्य | कु. सानिका सुनिल सावंत | ६०० | ५१८ | ८६.३३ |
| ०३ | कला | कु. वराली वैभव शिर्के | ६०० | ५१६ | ८६.०० |
| ०४ | वाणिज्य | कु. सारा अजितकुमार राणे | ६०० | ५०८ | ८४.६७ |

**पदवी परीक्षा २०२२-२०२३**

| | | |
|---|---|---|
| १. | कु. सलोनी सतीश राणे | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बी. एस. सी (AVAIATION) पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २. | श्री. सचिन बळीराम माने | मुंबई विद्यापीठ एल. एल. बी. पदवी परीक्षा - मे २०२३ उत्तीर्ण |
| ३. | कु. मोहित महेंद्रकुमार गायकवाड | मुंबई विद्यापीठ ( B. COM ) पदवी परीक्षा - एप्रिल २०२३ उत्तीर्ण |
| ४. | कु. श्रावणी सचिन माने | मुंबई विद्यापीठ एल. एल. बी. पदवी परीक्षा - एप्रिल २०२३ उत्तीर्ण |
| ५. | कु. विजया विकास पाटील | मुंबई विद्यापीठ ( B. A. ) पदवी परीक्षा - मे २०२३ उत्तीर्ण |

## कायदा विषयक पदवी परिक्षा उत्तीर्ण

☞ श्री. सचिन बळीराम माने व सौ. श्रावणी सचिन माने

☞ कै. नारायण वामन सावंत स्मृति पारितोषिक सौ. अनिता अनिल सावंत यांजकडून विभागून

## पदव्युत्तर परीक्षा

| | | |
|---|---|---|
| १. | कु. अमन सुर्यकांत कदम | Master in Supply Chain Management अभ्याक्रम University Collage of Dublin, Ireland येथून पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण |
| २. | कु. गंधार अजित खानविलकर | Master in Science in Nutritional Sciences & Dietetics पदव्युत्तर परीक्षा सिंबायोसिस रिकल्स अँड प्रोफेशनल विद्यापीठ, पुणे येथून उत्तीर्ण |
| ३. | कु. मानसी अजय खामकर | B. Pharma + MBA (Pharma Tach.) NMIMS University पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण |
| ४. | कु. पुनम मंगेश सावंत | मास्टर ऑफ सायन्स पदवी (मार्केटींग) पदव्युत्तर परीक्षा सिरॅकस युनिव्हर्सिटी न्यूयॉर्क येथून उत्तीर्ण |
| ५. | कु. कश्मीरा कृष्णकांत शिंदे | मास्टर इन सायन्स पदवी परीक्षा Nottingham Trent Univtdity, Uk येथून उत्तीर्ण |

**सर्वोच्च शैक्षणिक पात्रता -**

- कु. मानसी अजय खामकर
- कु. पुनम मंगेश सावंत
- कु. कश्मीरा कृष्णकांत शिंदे

☞ कै. धनाजीराव दिपाजीराव कदम यांच्या स्मरणार्थ. पुरस्कृत श्री. प्रदीप धनाजीराव कदम

☞ कै. भार्गव लक्ष्मण खामकर यांच्या स्मरणार्थ. पुरस्कृत श्रीमती हेमलता भार्गव खामकर

## राज्यस्तरीय विशेष प्राविण्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कपिल श्यामसुंदर परब | Elite Club of BW Marketing World Future Master 2023 मध्ये राष्ट्रीय स्तरावर विशेष प्राविण्य |
| २. | श्री. दत्तात्रय रखमाजी जगताप | ☞ योगा कल्चरल असोसिएशन, महाराष्ट्र आयोजित १२ व्या योगासन राज्य चॅम्पियनशिप स्पर्धा - २०२३ मध्ये प्रथम क्रमांक<br>☞ अकोला जिल्हा योगा असोसिएशन ४० व्या महाराष्ट्र योगासन राज्य चॅम्पिअनशिप स्पर्धत ५५ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक<br>☞ विलेपार्ले कल्चरल सेंटर आयोजित २३ वा पार्ले महोत्सव योगासन स्पर्धा ५५ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक<br>☞ आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशन आयोजित ४ थ्या आंतरराष्ट्रीय योगासन चॅम्पियनशिप स्पर्धा २०२३ मध्ये प्रथम क्रमांक |
| ३. | कु. अक्षय अशोक अदक | Chartered Accountant, ICAI Exam November 2023 उत्तीर्ण (मराठा मंडळ मुलुंड अभ्यसिका वर्गात अभ्यास करुन सदर यश प्राप्त केले आहे.) |

**विशेष गुणगौरव**

| | | |
|---|---|---|
| १. | कु. आर्या सचिन पाटील | १. अखिल भारतीय गणित आणि विज्ञान बौद्धिक परिक्षेत सर्व सीबीएस्सी शाळांमधून चतुर्थ क्रमांक प्राप्त<br>2. 29 Th Tini Mini Age Group Development Gymnastics Competition October - 2022 Under Age 06/ 08 Group Secured 2 Sliver Medals & Also Runner Up Trophy In Team Event |
| २. | कु. यश योगेश म्हामुणकर | १. Global Hackathon 2023 आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ७८० स्पर्धकांत ८० वा<br>२. Global hackathon 2023 आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ८००० स्पर्धकांत ५८ वा |
| ३. | कु. मायरा राजेश सावंत | Certificate of Merit in Max Speed Rollen Skating Club 1st Position 8th Innovational Speed Championship - 2023 |
| ४. | कुमार कनिष्क कृष्णकांत शिंदे | राज्य पातळी १९ वी ओपन स्टेट कराटे चॅपियनशिप स्पर्धा - २०२३ प्रथम क्रमांक व सुवर्णपदक प्राप्त |

**सैनिक शिक्षणात विशेष प्राविण्य :**

☞ कै. श्रीधर यशवंतराव स्मृति पारितोषिक श्री. प्रभाकर श्रीधर यशवंतराव यांजकडून कोणाचाही उमेदवारी अर्ज प्राप्त नाही.

## शिवजयंती उत्सव

मंडळाच्या प्रतिवर्षाच्या परंपरेनुसार या वर्षी सोमवार दि. १९/०२/२०२४ रोजी शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय भावना जागविण्याची परंपरा मराठा मंडळ मुलुंड, मुंबई या आपल्या संस्थेने शिवजयंती उत्सव साजरा करुन या ही वर्षी जपली. मंडळाच्या सभासदांच्या कलामंच विभागाने सादर केलेला साहित्य, संगीत, पोवाडा, नृत्य, नाट्य इत्यादी विविध कलाप्रकार असलेल्या **“हे प्रभो शिवाजी राजा”** हा अविस्मरणीय कार्यक्रम जोशपूर्ण झाला. महाराजांची कीर्ती वर्णन करताना सूत्रसंचालक सौ. करुणा सावंत व श्री. संजय परब यांना खरोखरच शब्द अपुरे पडत होते. त्यांनी खूप सुंदर शब्दांतून, तर कलाकारांनी आपल्या सहज अभिवाचनातून, नाट्यातून, नृत्यातून, पोवाड्यातून महाराजांच्या कीर्तीची, पराक्रमाची, आदर्शाची तसेच मावळ्यांच्या एकनिष्ठतेची गाथा सादर केली. तब्बल ४० कलाकारांसह, विविध कलाप्रकार घेऊन रंगमंचावर भव्य दिव्य असा कार्यक्रम सादर झाला.

## मंडळाची दहावी “रम्य दिवाळी पहाट”

दिनांक १४ नोव्हेंबर २०२३ रोजी पहाटे ६.३० वाजता मराठा मंडळ मुलुंड, मुंबई या आपल्या संस्थेच्या अखंड वाटचालीतील दहावी **“रम्य दिवाळी पहाट”** आनंदात, उत्साहात आणि रसिकांच्या प्रचंड उपस्थितीत साजरी झाली. यावेळी स्वप्निल पंडीत प्रस्तुत **“मेघ मल्हार”** हा सुमधुर मराठी गीतांचा नजराणा सादर करण्यात आला. या श्रवणीय कार्यक्रमात गायक कलाकारांसोबत वादक म्हणून स्वतः स्वप्निल पंडीत, नामवंत वादक अणि सुप्रसिध्द निवेदक ज्यांच्या जिभेवर साक्षात सरस्वती विराजमान असावी असे **श्री. मंदार खराडे** या सर्वानी रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी तळमजल्यापासून सभागृहापर्यंत नयनरम्य रोषणाई, रांगोळ्या, कंदील व दिव्यांची आरास करण्यात आली होती. सर्वांना दिवाळी निमित्त सुग्रास अल्पोपहाराचा आस्वाद देण्यात आला.

## मंडळाची सहकुटुंब वार्षिक सहल : "आजी आजोबांचे गाव" वाडा - पालघर

मराठा मंडळाची वार्षिक सहकुटुंब सहल रविवार दिनांक १८ फेब्रूवारी २०२४ रोजी "आजी आजोबांचे गाव" मु. वाघोटे (मनोर), ता. वाडा, पालघर येथे आयोजित करण्यात आली होती. ४ बस गाड्या भरुन सुमारे २५० स्त्री-पुरुष व मुलांनी या सहलीत सहभाग घेतला. मौज- मजा, गाणी, नृत्य, विविध खेळ, गप्पाटप्पा आणि स्वादिष्ट नाश्ता, शाकाहारी - मांसाहारी सुग्रास भोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला. सहलीमध्ये सहभागी वय वर्षे ७५ हून अधिक वय असणाऱ्या सभासदांचा या वेळी सन्मान करण्यात आला. उत्तम व नेटके आयोजन यामुळे ही स्नेहबंधाची सहल सदैव आठवणीत राहील अशी संस्मरणीय झाली.

## आपण सारे गाऊया प्रस्तुत सुनहरी यादें ... १९७० चे दशक

शनिवार दि. १५/०४/२०२३ रोजी आपण सारे गाऊया प्रस्तुत....सुनहरी यादे हा १९७० च्या दशकातील हिंदी चित्रपट गीतांचा कराओके कार्यक्रम खुप छान झाला. अप्रतिम अदाकारी आणि सोबत उत्तम सुत्रसंचालन करणारे श्रद्धा आणि विजय सुर्वे यांच्या संहिता लेखनास श्री. उदय दरेकर यांचे सहकार्य लाभले होते. सोबत संतोष सावंत यांच्या खुमासदार प्रस्तावनेची जोड, सर्वच गायकांची मेहनत आणि सादरीकरण उत्तमच! परीक्षक श्री. सुशांत बर्वे यांचे विचारपुर्वक मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध स्वरतरंग वाद्यवृंदाचे सर्वेसर्वा दिवंगत राजेंद्र शिंगरे यांचे श्री. हेमंत भोगले यानी काढलेले पेन्सिल स्केच फोटो फ्रेम, शिंगरे यांच्या पत्नी श्रीमती रमाली (मंगल) शिंगरे यांना भेट दिली. सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.रश्मी राणे, मंडळाचे अध्यक्ष रमेशजी शिर्के, सर्व पदाधिकारी, कार्यकारी मंडळ याच्या पाठिंब्याने आपण सारे गाऊया या हौशी कलाकार वृंदाचा प्रत्येक कार्यक्रम यशस्वी होतो.

## आषाढी एकादशी - अगा इठुला.... आणि दिंडी

मी मुलुंडकर, स्वरतरंग आणि मराठा मंडळ यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित "**अगा इठुला**" हा आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल नामाचा कार्यक्रम गुरुवार दि. २९/०६/२०२३ रोजी खरोखरच अप्रतिम सादर झाला. सर्वच गायक कलाकारांनी सर्वोकृष्ट सादरीकरण केल्यामुळे प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. या कार्यक्रमातील **मराठा मंडळाची दिंडी** याही वर्षी खूप छान सादर झाली. सर्व वारकरी धुंद होऊन भावभक्तीने उत्कृष्ट नाचले, खेळले. संपूर्ण सभागृह अभंगांच्या आणि दिंडीच्या गजरात भारावून गेले होते. यावेळी स्वरतरंगचे निमंत्रक श्री. सुशांत बर्वे यानी मंडळाचे हौशी गायक श्री. हेमंत भोगले आणि श्री. अजय माने यांना आपल्या स्वरतरंग मधून गाण्याची पहिली संधी दिली होती. दिंडीला लाभलेला आपल्या कलाकारांचा प्रतिसाद कौतुकास्पद होता. सौ. ऐश्वर्या ब्रीद यांनी विठ्ठलाची सुरेख रांगोळी साकारली होती. स्वरतरंगने आपल्या सलग चौथ्या कार्यक्रमात मंडळात दिंडी सादर करण्याची संधी दिली.

## शेवटपर्यंत गुढतेचा अनुभव देणारे शब्दबंबाळ नाटक - "काठपदर"

राज्यस्तरीय नाट्य महोत्सवात गौरवले गेलेले, उकृष्ट प्रकाश योजनेचे पारितोषिक पटकावलेले "**काठपदर**" हे प्रत्येकाला विचार करायला प्रवृत्त करणारे विलक्षण असे दोन अंकी नाटक मराठा मंडळ व लक्ष्मणझुला थिएटर्स प्रभादेवी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २२/०४/२०२३ रोजी मराठा मंडळात सादर झाले. वेगळी वाट शोधायला भाग पाडणारी प्रा. दिलीप जगताप यांची विलक्षण कथा, दिग्दर्शक राजीव वेंगुर्लेकर यांचे नेटके दिग्दर्शन, सर्व कलाकारांचे भन्नाट अभिनय, अनोखे असे शीर्षकाला साजेसे असे काठपदरी साड्यांचे आगळे वेगळे नेपथ्य, काळ्या पडद्याच्या पार्श्र्वभूमीवर रात्रीचा समय, गोठवणारी थंडी दाखवताना केलेला धुराचा वापर, गूढता निर्माण करणारे पार्श्वसंगीत आणि संपूर्ण प्रयोगाला अत्युच्च स्थानावर नेऊन ठेवणारी, मोलाचा वाटा असणारी प्रकाशयोजना यामुळे अत्यंत परिणामकारक असा वेगळी वाट चोखाळणारा दर्जेदार नाट्याविष्कार मंडळाच्या रंगमंचावर सादर झाला.

## आपण सारे गाऊया - सूर तेच छेडीता...

रविवार दि. ०२/०७/२०२३ रोजी आपण सारे गाऊया प्रस्तुत ... "**सूर तेच छेडीता**" हा मराठी गीतांचा कराओके कार्यक्रम खूप छान बहारदार झाला. सौ. करुणा सावंत यांनी खुमासदार प्रस्तावनेने कार्यक्रमाला सुरुवात केली. सौ. चित्रलेखा शिंदे आणि सौ. करुणा सावंत यांचे वर्णनात्मक देखणे, ओघवते सुत्रसंचालन कमाल होते.

अप्रतिम अदाकारी साकारणारे सौ. श्रद्धा आणि विजय सुर्वे यांची अफलातून जोडी यावेळीही खूप भाव खाऊन गेली.सर्वच गायकांची मेहनत आणि सादरीकरण उत्तमच! आपण सारे गाऊयाच्या आतापर्यंतच्या कार्यक्रमामधील सर्वात जास्त लक्षात राहणारा दिमाखदार असा हा "सूर तेच छेडीता" प्रेक्षकांच्या जास्त पसंतीस उतरला.

## मराठा मंडळ - महिला आघाडी

मराठा मंडळ महिला सभासदांची **महिला आघाडी** सतत कार्यरत असते. महिला आघाडीतर्फे महिलांच्या सुप्त गुणांना, कलेला, कर्तृत्वाला वाव देण्यासाठी वर्षभर विविध कार्यक्रम व उपक्रमांचे सुयोग्य आयोजन केले जाते. यासाठी आपल्या सभासद महिला दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी एकत्रित येऊन महिलांसाठी विविध कार्यक्रम करीत असतात. अहवालसाली महिला आघाडी तर्फे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी मुक्त व्यासपीठ, विरंगुळा समारंभ, महिलांचे वाढदिवस, खेळ, अध्यात्मिक तसेच आरोग्य विषयक व्याख्याने, मंगळागौरीचे खेळ, भोंडला इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच याही वर्षी सामाजिक उपक्रम म्हणून वृद्धाश्रमाला भेट देण्यात आली. गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी सभासद महिलांची वर्षा सहल काढण्यात आली. दरवर्षीप्रमाणे श्री तुळजाभवानी आईचा नवरात्र उत्सव मंडळात साजरा करण्यात आला. पुढील वर्षीही महिलांसाठी विविध उपक्रम कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा महिला आघाडी प्रमुख सौ. माधुरी तळेकर आणि निमंत्रक सौ. मनिषा साळवी यांचा मानस आहे. महिला आघाडीतर्फे घेण्यात आलेल्या काही महत्वाच्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

## संस्मरणीय महिला स्पेशल सहल - रोहिणी कृषी पर्यटन केंद्र, वसई

रविवार दि. ०९/०६/२०२३ मराठा मंडळ मुलुंड, मुंबई महिला आघाडीने मंडळाच्या सभासद महिलांसाठी... रोहिणी कृषी पर्यटन केंद्र, वसई येथे वर्षा सहल आयोजित केली. महिला आघाडीच्या या दुसऱ्या वर्षा सहलीस तब्बल ८५ महिलांचा प्रतिसाद लाभला होता. यात वयस्क महिलांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. सर्व मैत्रिणींना सामावून घेणारे मजेशीर खेळ आयोजित केल्याने सर्वजणी वय विसरुन मनसोक्त खेळल्या. या दुसऱ्या महिला स्पेशल सहलीच्याही संस्मरणीय आठवणी ह्दयाच्या एका कप्प्यात कायम कोरल्या गेल्या.

## "मनाची व्यक्तिमत्व विकास साधना" - भाव सत्संग

या विषयावर, सनातन संस्थेच्या साधिका आयुर्वेदाचार्या **डॉ. दीक्षा पेंडभाजे** यानी कलियुगात, समाजातील दूषित विषयांवर मात करण्यासाठी प्रत्येकाच्या मनाचा विकास होणे गरजेचे आहे हे सांगताना, हिंदू धर्माचे पालन, निसर्ग नियमांचे पालन, मनावरील ताबा, स्वभाव दोषांवर नियंत्रण इ. छोट्या गोष्टींतून आत्मविकास कसा करायचा, स्वत; मधील सत्वगुण कसे वाढवायचे या बद्दल छान विश्लेषण केले. व्यक्तिमत्व विकासाने आपण सुखाकडून आनंदाकडे कसे प्रयाण करु शकतो हे समजावून सांगितले. स्वभाव दोषांवर विचार करायला लावणारे खूप उपयुक्त अध्यात्मिक व्याख्यान होते.

## श्री तुळजाभवानी देवी नवरात्र उत्सव

प्रतीवर्षाप्रमाणे या वर्षीही भवानी देवीचा शारदीय नवरात्र उत्सव अतिशय प्रसन्न वातावरणात साजरा झाला. ''श्री दत्त भजनी मंडळ '' यांचे भजन आयोजित केले होते. पाचव्या दिवशी **भोंडला** सादर करण्यात आला. **करुणा सावंत, प्राजक्ता चव्हाण** या रांगोळी कलाकारांनी उत्सवाला साजेशा रांगोळ्या साकारल्या होत्या. रोज संध्याकाळी ७.०० वा. देवीची आरती, प्रसाद यांमुळे मंडळातील वातावरण मंगलमय व पवित्र असल्याचा अनुभव येत होता. नवरात्रीतील नऊ दिवसांच्या कालावधीत, प्रत्येक दिवशी, रंगसंकेतानुसार विविध रंगांच्या साड्या देवीच्या मूर्तीला परिधान करण्यात आल्या.

**नवरात्र उत्सवानिमित्त श्री तुळजाभवानी प्रतिमा साजशृंगार दिनांक १५ ऑक्टोबर २०२३ ते दिनांक २३ ऑक्टोबर २०२३**

| क्र. | वार | दिनांक | साडीचा रंग | सौजन्य |
|---|---|---|---|---|
| १ | रविवार | १५/१०/२०२३ | केशरी | सौ. साईली संजय परब |
| २ | सोमवार | १६/१०/२०२३ | पांढरा | सौ. शुभदा गणपत परब |
| ३ | मंगळवार | १७/१०/२०२३ | लाल | सौ. श्रद्धा विजय सुर्वे |
| ४ | बुधवार | १८/१०/२०२३ | निळा | सौ. शिल्पा मंदार बने |
| ५ | गुरुवार | १९/१०/२०२३ | पिवळा | सौ. पुनम प्रशांत विचारे |
| ६ | शुक्रवार | २०/१०/२०२३ | हिरवा | सौ. रुही विकास चव्हाण |
| ७ | शनिवार | २१/१०/२०२३ | राखाडी | सौ. सुचिता अरुण दळवी |
| ८ | रविवार | २२/१०/२०२३ | जांभळा | सौ. प्रियांका मेहुल राणे |
| ९ | सोमवार | २३/१०/२०२३ | मोरपिशी | सौ. रोहिणी चंद्रशेखर चाळके |

## महिला मेळावा

मराठा मंडळ मुलुंड, मुंबई च्या महिला आघाडीने रविवार दि. १० मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला मेळाव्याचे केलेले आयोजन आणि नियोजन कौतुकास्पद ठरले. मराठा मंडळाच्या महिला तसेच मुलुंड मधील सर्व महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने सभागृह उत्साहाने भारुन गेले होते. सुप्रसिध्द मालवणी सम्राज्ञी, टिव्ही मलिका अभिनेत्री, दिग्दर्शिका **सौ. संजीवनी जाधव** आणि त्यांची खुमासदार मुलाखत घेणाऱ्या सौ. शुभदा म्हामुणकर यांनी हा कार्यक्रम रंगतदार केला. संजीवनी ताईनी, आपल्या कला जीवनाला व बालपणातील आठवणींना या मुलाखतीच्या निमित्ताने उजाळा दिला. आजपर्यंतच्या प्रवासातील मनात ठसलेले अनेक अविस्मरणीय, धम्माल अनुभव, गमतीजमती यांबद्दल दिलखुलास गप्पा मारल्या. संपूर्ण सभागृहात हास्याची कारंजी उडत होती. कार्यक्रमाला लाभलेले सन्माननीय प्रायोजक व्हिस्प्रा अ‍ॅग्रोटेक प्रा. लि., रामकृष्ण नेत्रालय, लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटी, भगिरथी फूडस, रंगीबेरंगी, ज्ञानदिप को. ऑ. क्रेडीट सोसायटी,सारस्वत बँक, सुदर्शन शक्ती, मैत्री ग्रुप्स, कॅनरा बँक तसेच लोकप्रिय **शाहीर मधुकर खामकर** यांचा पुष्पगुच्छ

देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सोनाली सावंत यांनी केले. संजीवनी ताईना मानवंदना म्हणून सौ.श्रध्दा सुर्वे व सौ. मनाली महाडीक यांच्या अभिनयाने नटलेले आणि श्री. उदय दरेकर यांनी बसवलेले प्रहसन केवळ लाजबाब! ध्वनी संयोजन आणि रंगमंचावरील अप्रतिम सजावट श्री. हेमंत भोगले यांची होती. मंडळाच्या प्रवेशद्वारी, स्त्रीच्या मनातील भाव दर्शवणाऱ्या सुंदर रेखीव रांगोळीतून सौ. प्राजक्ता चव्हाण यांनी सुरवातीपासून कार्यक्रमात रंग भरले होते. मंडळाचे अध्यक्ष श्री. रमेश शिर्के, सरचिटणीस श्री. अजय खामकर यांचे मार्गदर्शन पदाधिकारी - कार्यकारिणी सदस्य, सर्व सल्लागार, महिला आघाडी प्रमुख सौ. माधुरी तळेकर, निमंत्रक सौ. मनीषा साळवी, संपूर्ण महिला आघाडी, विविध उत्स्फूर्त कार्यकर्ते यांच्यामुळेच महिला मेळावा यशस्वी झाला.

## भव्य ग्राहक पेठ - २०२४

जागतिक महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर, महिला उद्योजिकांना प्रोस्ताहन देण्यासाठी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई महिला उद्योजकांसाठी पुन्हा एकदा उद्योगिनी या दोन दिवसांच्या ग्राहकपेठेचे आयोजन केले. शनिवार दि. ९ मार्च २०२४ रोजी सकाळी या ग्राहक पेठेचा उद्घाटन सोहळा खुप उत्साहाने आणि धडाक्याने पार पडला. या सोहळ्याचे उद्‌घाटन मराठा मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. रमेश शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व स्टॉलधारकांचे गुलाबपुष्प आणि पेढे देऊन स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. यावेळेस ग्राहक पेठेत तब्बल ७१ स्टॉल लागले होते. खाऊ गल्ली तयार केली होती. खाऊ गल्ली ओसंडून वाहत होती. दोन्ही दिवशी ग्राहकांनी प्रचंड गर्दी केली होती. खुप उत्साहाचे वातावरण होते. सर्वच्या सर्व स्टॉलधारकांना उत्तम प्रतिसाद मिळाला. पुढील वेळी लवकरात लवकर पुन्हा आणि तोही निदान तीन दिवसांचा उपक्रम राबवावा अशा प्रकाराची मागणी सर्व स्टॉल धारकांकडून येत होती. मराठा मंडळाने खूप उत्तमरित्या या ग्राहक पेठेचे दिमाखदार असे आयोजन आणि नियोजन केले असे कौतुक सर्वत्र होत आहे. महिला मेळाव्याला लाभलेल्या प्रमुख पाहुण्या, नाट्य अभिनेत्री सौ. संजीवनी जाधव आणि मंडळाचे पदाधिकारी, सल्लागार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सर्व स्टॉलधारकांचे अभिनंदन केले. संपूर्ण सोहळ्यास मंडळाचे अध्यक्ष श्री रमेश शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले. सरचिटणीस श्री अजय खामकर यांचा भक्कम पाठिंबा, अपार मेहनत तसेच सर्व पदाधिकारी - कार्यकारिणी सदस्य यांचे प्रोत्साहन, महिला आघाडी प्रमुख सौ. माधुरी तळेकर, निमंत्रक सौ. मनिषा साळवी, सहचिटणीस सौ. ऐश्र्वर्या ब्रीद, सांस्कृतिक प्रमुख सौ. रश्मी राणे, फोटोग्राफर -व्हिडिओग्राफर श्री. कुणाल शिंदे, सर्व समिती महिला सदस्य यांच्या अथक परिश्रमाने याही वेळेची ग्राहक पेठ यशस्वीपणे पार पडली.

## वाचनालय / अभ्यासिका विभाग

मंडळाच्या **"सरस्वती वाचनालय** आणि **अभ्यासिका"** विभागाच्या वतीने मंडळाच्या सभासदांची वैचारिक व साहित्यिक अभिरुची जोपासली जाते. या ग्रंथालयात आज तारखेस विविध विषयांवरील सुमारे १७०० ग्रंथ-पुस्तके आहेत. यात कथा, कादंबरी, ललित वाङ्‌मय, कविता, ऐतिहासिक, धार्मिक, कला-क्रिडा, विनोद इ. साहित्य प्रकारांचा यामध्ये समावेश आहे. हे काम वाचनालय समितीचे सदस्य सेवाभावी वृत्तीने मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने करतात. वाचनालयात मराठी, इंग्रजी दैनिक वृत्तपत्र वाचण्यासाठी मोफत ठेवलेली असतात. याचा लाभ सभासद व इतर मुलुंडवासीयांना होत असतो.

मंडळाचे सभासद, त्यांची मुले तसेच मुलुंडमधील इतर शाळा - महाविद्यालयांचे व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी यांना अभ्यासाकरिता शांत-निवांत, सुरक्षित जागा उपलब्ध करुन देण्याकरिता अतिशय माफक दरात मंडळाच्या वतीने अभ्यासिका चालविली जाते. याचे व्यवस्थापन व नियंत्रण वाचनालय प्रमुख सौ मिनल सावंत व निमंत्रक श्री. प्रकाश पालव व वाचनालय समितीच्या वतीने उत्तम प्रकारे केले जाते.

## वसंत व्याख्यानमाला

महाराष्ट्र सेवा संघात, मुलुंड मधील चार संस्थाच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ मे २०२३ ते दि. ७ मे २०२३ असे एकूण चार दिवस वसंत व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. आपल्या मंडळाच्या सरस्वती वाचनालयाचा सुद्धा सहभाग होता. शनिवार दि. ६ मे रोजी आपल्या मराठा मंडळाकडे यजमान पद होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. संतोष सावंत यानी केले तर सरस्वती वाचनालया संबधीची उत्तम माहिती श्री. वसंत भोसले यांनी खूप चांगल्या पद्धतीने सादर केली. या अनोख्या व्याख्यानमालेला मुलुंडकारांनी एकच गर्दी केली होती.

## पंढरीची वारी

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुलुंड विभाग व सरस्वती वाचनालय, मराठा मंडळ मुलुंड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकदशी निमित्त "**पंढरीची वारी**" हा अनुभव कथन, कविता, अभंग सादरीकरणाचा कार्यक्रम सादर झाला. मराठा मंडळ सरस्वती वाचनालय तर्फे सौ. मिनल ह. सावंत व सौ. विजया शा. साटम यांचा या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग होता.

## दिवाळी अंक योजना - २०२३

सरस्वती वाचनालयाच्या विद्यमाने मंडळाच्या सभासदांकरीता प्रतीवर्षाप्रमाणे नाममात्र शुल्क (रु२५०) आकारुन दिवाळी अंक योजना राबविण्यात आली. या योजनेचा लाभ सभासदांसोबत वाचनालयात येणाऱ्या वाचक सभासदांनीही घेतला. एकंदर **१०६** सभासदांनी विविध विषयांचे दर्जेदार दिवाळी अंक नोव्हें. २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत वाचले.

## मुक्त अभिवाचन

शनिवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर करण्यात आलेल्या "मुक्त अभिवाचन" या कार्यक्रमाचा लाभ मंडळाच्या सभासदांनी घेतला. मंडळाच्या सभासदांच्या साहित्यिक कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी तसेच त्यांची वाचन अभिरुची समृद्ध करण्यासाठी सरस्वती वाचनालयतर्फे प्रथमच अशा प्रकारचा अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमासही मंडळाच्या सभासद वाचकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. एकंदर २१ वाचकांचा सहभाग लाभला. या कार्यक्रमास डॉ. वीणा सानेकर या मराठी विभाग प्रमुख, सौमय्या महाविद्यालय यांचे अभिवाचन या विषयावर अनमोल मार्गदर्शन लाभले.

## कवितांची दिवाळी

रविवार दि. ३/१२/२०२३ रोजी मराठा मंडळ, मुलुंड संचालित सरस्वती वाचनालय अभ्यासिका विभागातर्फे सुप्रसिद्ध, कविवर्य, गझलकार, स्तंभलेखक, कथाकार **श्री. मनोज वराडे** यांचा "**कवितांची दिवाळी**" हा एकल काव्य कार्यक्रम सादर करण्यात आला. श्री मनोहर जुन्नरे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. दर्दी प्रेक्षकांच्या मनाचा,भावनाचा ठाव घेणाऱ्या कवितांमधून कवी मनोज वराडे यांचा स्पष्टवक्तेपणा, सुस्पष्ट सुमधूर आवाज, आत्मीयता प्रगट होत होती. त्यांच्या श्री स्वामी समर्थ महाराजांच्या काव्याला प्रेक्षकानी टाळ्यांच्या गजरात उस्फूर्तपणे साथ देताना कार्यक्रम भव्य उंचीवर नेऊन ठेवला. कार्यक्रमाची सांगता सौ. करुणा सावंत यांच्या सुमधुर आवाजातील पसायदानाने झाली. यापुढेही असेच कार्यक्रम देण्याचा सरस्वती वाचनालय / अभ्यासिका विभागाचा प्रयत्न आहे.

## वधू - वर सूचक मंडळ

मराठा ज्ञाती समाजातील उपवर मुलामुलींचे विवाह योग्य ठिकाणी जुळविण्याच्या सेवाभिमुख आणि उदात्त हेतूने, मराठा मंडळ मुलुंड, मुंबई संचालित वधू वर सूचक मंडळाची स्थापना दि. ११/१०/१९९७ रोजी विजयादशमीच्या मंगलमय मुहुर्तावर झाली.

वधू वर मंडळाचे कामकाज, मंडळाच्या महिला कार्यकर्त्या दर शनिवारी संध्याकाळी ५ ते ७.३० तर पुरुष कार्यकर्ते दर रविवारी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत नियमितपणे पाहतात. वधु - वर व पालकांचा या उपक्रमास उत्तम प्रतिसाद लाभतो. शिवाय मंडळाची अद्ययावत वेबसाईट **www.marathamandalmulund.com** यावरील ऑनलाईन नोंदणीसाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे. वधू-वर सूचक मंडळाने संपूर्ण वर्षभराचे सुयोग्य वेळापत्रक तयार केले आहे. त्यानुसार अत्यंत शिस्तबद्धपणे संपूर्ण कामकाज चालते. ऑनलाईन टीम, ऑनलाईन प्रक्रिया उत्तम सांभाळते. अहवालसाली ऑनलाईन व ऑफलाईन कामकाज मिळून **५००** च्या वर अशी उत्तम नोंदणी झाली. प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी वधू-वर सूचक मंडळाने वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन केले होते. मेळाव्यासही उत्तम प्रतिसाद मिळाला.वधूवर मंडळ व्यवस्थित व शिस्तबध्द पद्धतीने हाताळण्यास प्रमुख श्री. सदानंद दळवी व निमंत्रक श्री. श्रीकांत पालव आणि मा. सहचिटणीस श्री. दिगंबर राणे व सौ. ऐश्वर्या ब्रिद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभते. मंडळाच्या या उपक्रमाला मा. अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, याचा भक्कम पाठिंबा व सहभाग लाभत असतो.

## चौदावा वधू - वर पालक परिचय मेळावा

मराठा समाजातील नियोजित वधू-वराची लग्ने लवकर व सुयोग्य ठिकाणी जमावीत ही संकल्पना बाळगून मराठा मंडळातर्फे दरवर्षी वधू - वर पालक परिचय मेळावा भरविण्यात येतो.

अहवालसाली **चौदावा वधू-वर पालक परिचय मेळावा** रविवार दि. ०५/११/२०२३ रोजी थाटात संपन्न झाला. मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने ऑफलाईन व ऑनलाईन मिळून **१३४** वधू-वरांची विक्रमी नोंदणी होऊन उत्तम प्रतिसाद लाभला. ऑनलाईन फॉर्म व पैसे भरण्यासाठी मंडळाच्या वेबसाईटवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. वधू- वरांसह दोन पालकांनीही मेळाव्यात सहभाग घेतला होता. नोंदणी झालेल्या वधूवरांची संपूर्ण माहिती असलेला तपशील त्याना देण्यात आला. सनईच्या सूरांनी कार्यक्रमाची सुरुवात, वधूवरांचे मंचावरुन प्रत्यक्ष प्रेझेंटेशन, एलईडी स्क्रीन तसेच सौ. सोनाली सावंत, सौ. शुभदा म्हामुणकर, सौ. मनाली महाडीक यांचे नेटके सूत्रसंचालन, ऐश्वर्या ब्रीद यांनी प्रवेशद्वारावर साकारलेली आकर्षक रांगोळी, चहा आणि अल्पोपहाराची उत्तम सोय यामुळे मंडळाच्या सभागृहात एक उत्तम अविष्कार साकारला गेला. वधू-वर मंडळाचे प्रमुख श्री. सदानंद दळवी व निमंत्रक श्री. श्रीकांत पालव यांचे कुशल नेतृत्त्व सर्व उपसमिती सदस्यांचे सहकार्य, मंडळाचे अध्यक्ष व संपूर्ण कार्यकारी मंडळ सल्लागार यांचे मार्गदर्शन, कार्यालयीन कर्मचाऱ्यांची मदत आणि वधुवर समितीच्या प्रत्येक सदस्याच्या मेहनतीचे फळ म्हणजे हा दिमाखदार वधू-वर पालक परिचय मेळावा !

## मंडळाचे आदरणीय सभासद "कोकण साहित्यरत्न - कवी श्री. अशोक लोटणकर"

साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल कोकण युवा प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा **कोकण साहित्यरत्न** या पुरस्कारासाठी मंडळाचे ज्येष्ठ सभासद कवी **श्री. अशोक लोटणकर** यांची निवड करण्यात आली त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन ! श्री अशोक लोटणकर यांनी अनेक कविता, ललित, लेख, पुस्तके लिहिली आहेत. अनेक पुरस्कार मिळविले आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल मंडळाचा मनाचा मुजरा !

## सुरमयी शाम

रागदीप निर्मित, म्युझिकल वेव्हज प्रस्तुत आणि मराठा मंडळ, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने **"सुरमयी शाम"** मराठी भावगीत, सिनेगीत आणि लोकप्रिय हिंदी गजल असा बहारदार गाण्यांचा कार्यक्रम शनिवार दि. ४/११/२०२३ रोजी मराठा मंडळ येथे सादर झाला. संकल्पना आणि निर्मिती **प्रदीप भेंडे** व **पराग पौनीकर** यांची होती. गायक कलाकारांचे सुरेल गायन, त्याना मिळणारी वाद्यवृंदांची अप्रतिम साथ, तसेच **अंकीता सोवनी - दामले** यांचे खुमासदार निवेदन हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य होते.

## अभिनंदन!! अभिनंदन!!

मराठा मंडळ मुलुंड, मुंबई या आपल्या ज्ञाती संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. रमेश शिर्के हे अखिल मराठा फेडरेशन या संस्थेच्या सल्लागारपदी कार्यरत आहेत. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. महेश चव्हाण हे ही याच संस्थेच्या कोषाध्यक्षपदी कार्यरत आहेत. तसेच मुलुंड मधील २७ संस्थांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या १२६ व्या आचार्य अत्रे जयंती कार्यक्रम समितीच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा याही वर्षी श्री. महेश चव्हाण यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. कनेडी गट शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई या संस्थेत मंडळाचे उपाध्यक्ष श्री. शिवाजी जगन्नाथ सावंत हे सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. जुन्नर आंबेगाव तालुका रहिवाशी विकास मंच या संस्थेत मंडळाचे सल्लागार श्री. सुरेश डुंबरे हे सरचिटणीस पदावर कार्यरत आहेत. तर मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर ना. भालेराव हे याच संस्थेत कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. तसेच दि मुलुंड सिटीझन को. ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड मध्ये सचिव पदावर काम करत आहेत. मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. वसंत सखारामराव भोसले अणि कार्यकारिणी सदस्य श्री. राजन गोपाळराव भोसले यांची छत्रपती शिवाजी महाराज विद्याप्रसारक मंडळ संचालित छ. शि. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज खोपी. ता. खेड जि. रत्नागिरी या संस्थेच्या अनुक्रमे अध्यक्ष व सरचिटणीसपदी सन्माननीय निवड झाली आहे. अपना बाजार मुलुंड (प.) डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. वसंत भोसले यांची यावर्षी पुन्हा एकदा निवड झाली. ग्राहक हितासाठी चांगले काम करण्याचा त्यांना मोठा अनुभव आहे. आम्हाला आपणा सर्वांचा अभिमान वाटत आहे. आपण सर्वजण आपल्या मंडळाच्या शिरपेचातील झळकणारे तेजस्वी तुरे आहात.

## तरुण मराठी शेतकऱ्याला मराठा मंडळाचे सहाय्य

Ekrushak च्या **उमेश तानाजी देवकर** या एक मराठी तरुण, तडफदार, जिज्ञासू, अभ्यासू, सुशिक्षित शेतकऱ्याला आपल्या क्षेत्रातील सेंद्रिय खतावर उत्पादित केलेल्या ताज्या भाज्या, फळे ठेवण्यासाठी जागेची गरज असताना, मंडळाने आपली रिकामी जागा उपलब्ध करुन दिली आहे. अशा प्रकारे मंडळाने उपयोग, फायदा आणि कर्तव्य यांचा विचार करुन आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. दर बुधवारी मंडळात फळे व भाज्या सकाळी ७ ते ११ या वेळेत मुलुंडकरांसाठी उपलब्ध असतात.

## विद्यार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिली

मराठा मंडळाने मराठी मुलांना, मराठी भाषा संवर्धनासाठी, मराठी एकांकिकेच्या तालमी साठी आणि मराठी कलाकार घडविण्यासाठी ऐनवेळी वझे केळकर कॉलेजच्या रंगकर्मी विद्यार्थ्यांना आपली जागा उपलब्ध करुन दिली. हे फारच मोठे कार्य मंडळाने केले. वझे केळकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मंडळाच्या या सहकार्याचे सार्थक केले. INT एकांकिका स्पर्धेत यावर्षीचे प्रथम पारितोषिक या रंगकर्मींनी पटकावले. आपल्या संस्थेकडे असलेल्या प्रशस्त जागेचा हा खऱ्या अर्थाने सदुपयोग ठरला!!

# मंडळाच्या विद्यमाने, तसेच मंडळात चालणारे कांही समाजोपयोगी उपक्रम

## आरोग्य शिबीर







रविवार दि. ३/१२/२०२३ रोजी मराठा मंडळ, मुलुंड ज्येष्ठ नागरीक समन्वय व आरोग्य समिती आणि फोर्टिस हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ व स्थानिक नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर पार पडले. फोर्टिस हॉस्पीटलच्या तज्ञ डॉक्टरांकडून विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. मुलुंड मधील जवळ जवळ २०० नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन समिती प्रमुख श्री. राजन भोसले, निमंत्रक श्री. हरिश्चंद्र सावंत आणि सदस्य यांनी उत्तमरित्या केले. हा समाजोपयोगी उपक्रम यशस्वी करण्याकरीता समिती सोबत संपूर्ण कार्यकारिणी, समन्वयक, सर्व उपसमित्या यांनी अथक परिश्रम घेतले होते.

## निरोगी मुलुंड - २०२४



मराठा मंडळ मुलुंड ज्येष्ठ नागरिक व आरोग्य समिती आयोजित व मुलुंडस्थित सुप्रसिद्ध डॉ. आश्विन सावंत व डॉ. सुचेता सावंत यांच्या संकल्पनेने साकारलेला "निरोगी मुलुंड २०२४" हा कार्यक्रम रविवार दि. २१/०१/२०२४ रोजी अतिशय यशस्विरीत्या पार पडला. मंडळाच्या प्रवेशद्वारी विषयाला समर्पक अशी सुंदर रांगोळी सौ. करुणा सावंत यांनी काढली होती. श्वसनविकार तज्ञ **डॉ. नटराजन सुब्रमणीयन** यांनी प्रदूषणाचे श्वसनमार्गावर होणारे अपाय आणि उपाय. त्वचारोगतज्ञ **डॉ. मंजुषा कुरुवा** यांनी प्रदुषणाचे त्वचेवर होणारे अपाय आणि उपाय, हृदयरोग तज्ञ **डॉ. राजीव कर्णिक** यांनी प्रदुषणाचे हृदय अणि मस्तिक यांवर होणारे अपाय आणि उपाय आणि सरतेशेवटी **वैद्य अश्विन सावंत** यांनी, लोकांचे डोळे उघडणारे व विचार करण्यास प्रवृत्त करणारे तडफदार व्याख्यान देऊन निरोगी मुलुंड कार्यक्रमावर कळस चढवला. डॉ. सुचेता सावंत यांचे प्रभावी सूत्रसंचालन लोकांना भावेल असे होते. समाजासाठी काहीतरी चांगलं करण्याचा डॉ. आश्विन सावंत व डॉ. सुचेता सावंत या उभयतांचा हा प्रयत्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई नेहमीच भक्कम पाठींबा देत असते.

## पोलिओ लसीकरण



बृहनंमुंबई महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य खाते मुलुंड यांच्या वतीने मराठा मंडळामध्ये सार्वत्रिक पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मुलुंड मधील बालकांचे लसीकरण करण्यात आले.

## श्री नित्यानंद वृद्धाश्रमास सदिच्छा भेट




शुक्रवार दि. १२/१०/२०२४ रोजी महिला मंडळाने मीरा रोड येथील श्री नित्यानंद आश्रमास भेट दिली. खरोखरच मन विचलित व विमनस्क करणारा असा एकूण तेथील माहोल होता. बेवारस, निराधार ज्येष्ठ नागरिक, वंचित निराधार महिला, मुले यांना आश्रय व त्यांचे सक्षमीकरण या उदात्त हेतूने हा आश्रम उभारला गेला आहे. "आपण सारे गाऊया" गानवृदांतील काही गायक कलाकारांनी काही गाणी सादर करुन तेथील पिडीतांच्या नैराश्यमय जीवनात आनंदाचे दोन क्षण पेरण्याचा प्रयत्न केला. महिला मंडळ भगिनींनी पुढाकार घेऊन पिडीतांच्या आश्रमास धनधान्य, जीवनावश्यक वस्तू व रोख रक्कम अशी मदत केली. असा उपक्रम राबवून निराधारांबद्दल जनजागृती करण्याच्या त्यांच्या कार्याला सलाम!

## मोफत नेत्र तपासणी शिबीर



मराठा मंडळ मुलुंड ज्येष्ठ नागरिक समन्वय व आरोग्य विभाग समिती आणि श्री रामकृष्ण नेत्रालय मुलुंड पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ९ मार्च आणि रविवार १० मार्च २०२४ रोजी दोन दिवस **मोफत नेत्र तपासणी** शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मुलुंडमधील, पहिल्या दिवशी १३० आणि दुसऱ्या दिवशी ११६ असे एकूण २४६ नागरीकांनी या शिबीराचा लाभ घेतला. मंडळाचे अध्यक्ष श्री. रमेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सरचिटणीस श्री. अजय खामकर त्यांच्या प्रयत्नांमुळे हे शिबीर यशस्वीरित्या पार पडले. मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सेवक वर्ग आणि सहकारी समित्या यांच्या अथक परिश्रमामुळे शिबीराचे आयोजन सुव्यवस्थितपणे पार पडले.

## मंडळाच्या विद्यमाने आणि आयोजित रक्तदान शिबीरे





सामाजिक जाणीवेतून आपल्या मंडळात प्रतीवर्षी तीन /चार वेळा रक्तदान शिबीरे आयोजित करण्यात येतात. या योगे मंडळाने सामाजिक जाणीव जोपासली आहे.

## देशाचे पहिले लोकपाल - सन्माननीय श्री. अजयराव माणिकराव खानविलकर

आपल्या देशाचे **“लोकपाल”** म्हणून सन्माननीय **श्री. अजयराव माणिकराव खानविलकर** यांची निवड झाली आहे. अवघ्या मराठा समाजाला तसेच कोकणवासियांना अभिमान वाटावा अशी ही शुभ घटना! आदरणीय अजयराव खानविलकर यांचे वडील श्री. माणिकराव खानविलकर हे आपल्या मराठा मंडळाचे ज्येष्ठ सभासद आहेत. खानविलकर साहेब यांचे आपल्या संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा!

## चिन्मय मिशन : एक ज्ञान यज्ञ

११ ते १७ जानेवारी २०२४ या कालावधीत चिन्मय मिशन या जगभरात २५० हून अधिक केंद्रे असलेल्या, अध्यात्मिक संस्थेचा प्रवचन कार्यक्रम, अर्थात ज्ञानयज्ञ, आपल्या संस्थेच्या सभागृहात सादर झाला. **स्वामी प्रत्यानंदजी** यांचे आध्यत्मिक प्रवचन : ज्ञानयज्ञ ऐकण्यासाठी सभागृहात सातही दिवस एकच गर्दी असायची. विशेषतः आपल्या महान राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संपूर्ण जगाच्या सर्वांगीण विकासासाठी ही संस्था काम करत असते. सुसंवादी, गतिमान जीवनासाठी, समाजाची सेवा करण्याच्या मूल्यावर आधारित आध्यात्मिक जीवनासाठी व्यक्तींना वेदांताचे ज्ञान देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट्य होते. ही संस्था ज्ञानयज्ञ ( अध्यात्मिक चर्चा), कार्यशाळा, मानवी विकासाशी संबधित विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करत असते.

## मराठी भाषा दिन प्रभात फेरी

मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी, मुलुंडमधील काही सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध संस्थाच्या संयुक्त विद्यमाने **“मराठी भाषा दिन प्रभात फेरीचे”** आयोजन केले होते. या फेरीत मराठा मंडळ सोबत मुलुंड मधील अनेक शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि अनेक संस्थाचा सहभाग लाभला. मंडळाचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष. कार्यकारिणी सदस्य यांच्यासह अनेक सभासद या फेरीत सहभागी झाले होते. **मराठमोळं मुलुंड** या संस्थेने या फेरीच्या नियोजनात पुढाकार घेतला होता आणि मराठा मंडळाने या उपक्रमात सर्वतोपरी सहकार्य केले.

## मराठा मंडळाचे संकेत स्थळ

मराठा मंडळाची बेबसाईट आहे, त्यावर या अहवालाद्वारे आवाहन करीत आहोत की आपल्याकडे साहित्य, पर्यटन, गायन, वादन, नृत्य, अभिनय, कला, आरोग्यविषयक, पाककला, उद्योजगता, चित्रकला, पेंटिग, रांगोळी, पुरातन वस्तुसंग्रह आणि इतर वेगवेगळ्या विषयांवर जर आपल्याकडे स्वलिखित मजकूर असेल तर **marathamandalmulund@gmail.com** वर पाठवावा. या विषयांवर पेजेस निर्माण करुन आपल्या वेबसाईटवर नवीन माहिती अपलोड केली जाईल.

## सभासद डेटाबेस :

मागील अहवालात आवाहन केल्यानंतरही काही सभासदांचे ई-मेल ॲड्रेस आणि व्हॉटस् ॲप नंबर, मोबाईल नंबर आलेले नाहीत. ज्या सभासदांनी ही माहिती मंडळात दिलेली नाही त्यांनी आपला ई-मेल ॲड्रेस, व्हॉटस‌ॲप नंबर, मोबाईल नंबर हे मंडळाच्या व्हॉटस‌ॲप क्रमांकावर (७०४५०२२०९६) पाठवावेत.  जेणेकरुन सभासदांना त्यांच्या व्हॉटस् ॲप नंबर आणि ई-मेल व्दारे मंडळाचे कार्यक्रम, उपक्रम यांबद्दलची माहिती तसेच कार्यक्रमाचे निमंत्रण पाठविणे सोयीचे होईल. प्रिटिंग आणि पोस्ट इ. खर्च आणि वेळही वाचेल.

## कार्यालयीन व्यवस्थापन आणि इमारत देखभाल

**स्वयंपाकगृहाच्या संबधी महानगरपालिकेकडून घेतलेल्या मंजूर आराखड्यानुसार केलेले बदल पुढील प्रमाणे :**

१. किचनच्या वरती असलेले पहिल्या मजल्यावरील पुरुष प्रसाधनगृह हे महिला प्रसाधनगृहाच्या बाजूला शिफ्ट केले त्यामुळे पुरुष प्रसाधनगृह च्या जागी एक मोठी जागा तयार झाली.

२. हॉल मधील स्टेजच्या बाजूच्या दोन्ही वधू-वर खोल्यांमधील प्रसाधनगृहाचे नूतनीकरण करण्यात आले आणि दोन्ही रुममध्ये नवीन वातानुकूलित यंत्रे बसविण्यात आली.

३. मंडळाच्या तळमजल्यावरील संपूर्ण लाईटची वायरींग नविन करण्यात आली

४. तळमजल्यावरील मागील बाजूस (भांडी धुण्याची जागा) टाइल्सने सुशोभिकरण करण्यात आले.

५. तळमजल्यावरील प्रसाधनगृहाचे संपूर्णतः नुतनीकरण करण्याचे काम चालू आहे.

६. मंडळाच्या इमारतीतील मागील जिन्याच्या आतील भागाचे संपूर्ण रंगकाम करण्यात आले.

७. मराठा मंडळाचे नाव व नावाचा लोगो इमारतीच्या समोरील दर्शनी भागी मध्यावर लावण्यात आला. आई तुळजाभवानी मंदिराचा (श्रीदेवी तुळजाभवानी) बोर्ड सुद्धा नवीन बसविण्यात आला. त्यामुळे मंडळाचा दर्शनी भाग सुशोभित दिसत आहे.

## २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षात सध्या चालू असलेली व पूर्ण करावयाची कामे

१. स्वयंपाक घराच्या आराखड्यानुसार इमारतीच्या तळमजल्यावरील मागील बाजूस असलेले पुरुष व महिला प्रसाधनगृह दुरुस्ती करुन वापरात आणणे. हे काम सध्या अहवाल सालानंतर चालू आहे.

२. तिसऱ्या मजल्यावर पुरुष प्रसाधनगृहा शेजारी महिलांसाठी प्रसाधनगृह बांधण्याचे काम चालू आहे.

३. मंडळाच्या दोन्ही सभागृहात एअर कर्टन बसविणे.

४. तिसऱ्या मजल्यावरील अभ्यासिका वर्गाची रंगरंगोटी करणे.

## सौर उर्जा प्रकल्प

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या इलेक्ट्रिसिटी बिला संदर्भात काहीतरी ठोस पर्याय करण्यात यावा अशी विविध सामाजिक संस्थांची योजना असते परंतु बऱ्याच योजना या फक्त कागदपत्रांवरच राहतात. प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी ही खूप कमी होते, परंतु मराठा मंडळ मुलुंड, मुंबई या सेवाभावी सामाजिक संस्थेने फक्त असे प्रकल्प कागदावर न ठेवता त्याची अंमलबजावणी करुन समाजसेवेचे एक वेगळेच परिमाण निर्माण केले आहे,

भरमसाठ वाढत्या वीज बिलामुळे आपल्या मराठा मंडळ मुलुंड, मुंबई या संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सौर उर्जा प्रकल्प कार्यान्वयीत करण्याचा एकमताने निर्णय घेतला. मे. क्युसार इनोव्हेटिव्ह सोल्युशन (QINSO) यांच्या मार्गदर्शना अंतर्गत हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला. या प्रकल्पामुळे दरवर्षाला अधिकाधिक वीज बिल कमी करण्यास मंडळास नक्कीच मदत होणार आहे.

## मंडळामध्ये नियमितपणे चालणारे काही उपक्रम - शैक्षणिक, सांस्कृतिक वर्ग

| उपक्रम किंवा वर्ग | आयोजक संस्था किंवा व्यक्ती | दिवस | वेळ |
|---|---|---|---|
| वधू-वर सूचक मंडळ | मराठा मंडळ मुलुंड, मुंबई | फक्त शनिवार व रविवार | शनिवार संध्या. ५ ते ७.३०<br>रविवार सकाळी १० ते दु. १.०० |
| सरस्वती वाचनालय | मराठा मंडळ मुलुंड, मुंबई | सोमवार ते रविवार | सोम. ते शनि संध्या. ५ ते ७.३०<br>रविवार सकाळी १० ते दु. १.३० |
| अभ्यासिका | मराठा मंडळ मुलुंड, मुंबई | सोमवार ते रविवार | सकाळी ८ ते रात्रो ९ |
| वर्तमानपत्र कक्ष | मराठा मंडळ मुलुंड, मुंबई (फक्त सभासदांसाठी ) | सोमवार ते रविवार | सोम. ते शनि सकाळी. ११ ते ७.००<br>रविवार सकाळी ११ ते दु. १.३० |
| नृत्यकला वर्ग | श्री. राहुल शेरकर | सोमवार /बुधवार / शुक्रवार | सायं. ७.०० ते ९.०० |
| नृत्यकला वर्ग | श्री. अभिजित गणपत देसाई | मंगळवार /गुरुवार / शनिवार | सायं. ६.३० ते ९.०० |
| नृत्यकला वर्ग (भरतनाट्यम) | सौ. सोनाली सं. कदम | फक्त रविवार | सकाळी ९ ते १२.०० |
| नृत्यकला वर्ग (कथ्थक) | गौरी सावंत | मंगळवार /गुरुवार | सायं. ७.०० ते ८.०० |
| चित्रकला | श्रीमती सुधा पाटील | शनिवार / रविवार | दुपारी १.०० ते ४.०० |
| कराटे | श्री. चैतन्य सावंत (शोटोकोन) | मंगळवार /गुरुवार / शनिवार | सायं. ६.३० ते ७.३० |
| योग | जीवनसरिता | सोमवार ते शनिवार | सकाळी ६.३० ते ८.३० |
| योग | सौ. राजश्री मोरे | सोमवार ते शुक्रवार | दुपारी ४.०० ते ६.०० |

**माहे सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत मंडळात होणारे कार्यक्रम व समारंभ इ. चा तपशील**

१. माहे ऑक्टोबर २०२४ सरस्वती वाचनालय विभाग आयोजित निबंध स्पर्धा या निबंध स्पर्धेचे गटवार विषय व अन्य तपशील यासाठी मंडळाच्या वाचनालय अभ्यासिका विभागाशी संपर्क साधावा.

२. माहे नोव्हेंबर २०२४ मराठा मंडळ मुलुंड, **एकदिवसीय अभिनय प्रशिक्षण शिबिर**

३. दिनांक ०३/१०/२०२४ ते ११/१०/२०२४ **नवरात्रौत्सव** दररोज संध्या. ७.०० वाजता **देवीची आरती**

४. दिनांक १८,१९ आणि २० ऑक्टोबर २०२४ रोजी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई आयोजित **ग्राहक पेठ**

५. माहे ऑक्टोबर २०२४ **समाजोपयोगी किर्तन**, तपशील योग्य वेळी कळविणात येईल

६ मुलुंड मधील सर्व महिला संस्था प्रतिनिधींचा **स्नेह मेळावा**

७. माहे ऑक्टोबर २०२४ रोजी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई ४६ वा **वर्धापनदिन व कोजागिरी पौर्णिमा समारंभ**

८. दिनांक ०२ नोव्हेंबर २०२४ रोजी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई आयोजित **दिवाळी पहाट**

९. दिनांक १० नोव्हेंबर रोजी मराठा मंडळ मुलुंड, मुंबई १५ वा वधु वर **पालक परिचय मेळावा**

१०. सरस्वती वाचनालय / अभ्यासिका आयोजित शालेय विद्यार्थ्यांसाठी **चित्रकला स्पर्धा**

११. माहे नोव्हेंबर /डिसेंबर २०२४ रोजी **कौटुंबिक वार्षिक सहल**

१२. माहे डिसेंबर २०२४ अखेर किंवा माहे जानेवारी २०२५ प्रारंभी मंडळाचे ४६ वे **वार्षिक स्नेहसंमेलन**, **विद्यार्थी व गुणीजनांचा गौरव समारंभ**

१३. दिनांक १९/०२/२०२५ रोजी **शिवजयंती उत्सव**

१४. दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी येणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या महिला आघाडीच्या विद्यमाने माहे मार्च २०२५ मध्ये योग्य दिवशी **महिला मेळावा**! यासंबधीचा तपशील योग्य वेळी जाहीर करण्यात येईल.

१५. **रांगोळी प्रशिक्षण शिबीर** या संबधीचा तपशील योग्य वेळी जाहीर करण्यात येईल.

मंडळाच्या सर्व सभासदांनी वरील प्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रम, समारंभ यांची माहिती त्या त्या वेळी मंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधून घ्यावी व आपल्या संपर्कातील अन्य सभासदांना द्यावी. या सर्व कार्यक्रमांचा सुयोग्य तपाशिल, माहिती इ. योग्य वेळी प्रसिद्ध करण्यात येईल. सभासदांनी आपले व्हॉटसअॅप सुविधा असणारे मोबाईल क्र. व आपला ई-मेल कार्यालयात कळवावेत, म्हणजे सभासदांना या माध्यमाद्वारे सर्व कार्यक्रमांची माहिती मिळू शकेल.

**- अजय खामकर**

सरचिटणीस

## मंडळात चालविण्यात येणारे इतर छंद व अभ्यास वर्गः

मंडळात भरतनाट्यम, नृत्यवर्ग, कराटे, चित्रकला, योगवर्ग नियमित सुरु आहेत. इच्छुकांनी या विषयी अधिक माहितीसाठी मंडळाच्या कार्यालयात संपर्क करावा.

## सभासद बंधू-भगिनींसाठी सभागृह आरक्षणासंबंधी आकर्षक योजना

मंडळाचे सभासद बंधू - भगिनी यांच्या स्वतःच्या मुलांच्या किंवा नातवंडाच्या एखाद्या मंगल कार्यासाठी / समारंभासाठी सभागृह आरक्षण आकारामध्ये **१० टक्के** तसेच जे सभासद दहा हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचे देणगीदार असतील अशांना अतिरिक्त ५ टक्के अशाप्रकारे **१५ टक्के** भाडे सवलत देण्यात येत आहे. या बरोबरच आर्थिक वर्षातून केवळ एक वेळ सभासदांचे आप्तस्वकीय यांनासुध्दा सभासदाने विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन दिल्यानंतर केवळ **१० टक्के** भाडे सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, या साठी अतिरिक्त ५ टक्के सवलत लागू होणार नाही. सभासदांनी या सवलतीचा लाभ घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा.

## मंडळाच्या सध्याच्या आर्थिक पेच प्रसंगातून बाहेर येण्यासाठी कार्यकारी मंडळाने प्रस्तावित केलेल्या काही संकल्पना

सभासद बंधू-भगिनींनी अत्मियतेने प्रयत्न करण्यासाठी पुढील पैकी कोणत्याही प्रकारे आपले बहुमोल योगदान-सहकार्य द्यावे. यासाठी मा. कार्याध्यक्ष **श्री. महेश चव्हाण** (९८२०५७१२१९) मा. सरचिटणीस **श्री. अजय खामकर** (९८२०६५९९००) यांचेशी संपर्क साधावा.

१) दुसरा मजला सभागृहाला नाव देण्यासाठी एखादा मराठा समाजाचाच पुरस्कर्ता मिळविणे.

२) कॉर्पोरेट क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या सी एस आर फंडामधून देणगी मिळविण्याचे प्रयत्न करणे.

३) विविध धर्मादाय व अन्य संस्थांकडून मदत मिळविण्याचे प्रयत्न करणे.

४) देवस्थाने व संस्था यांच्याकडून देणग्या मिळवण्याचे प्रयत्न करणे.

५) परदेशस्थ भारतीय-ज्ञातीबांधवा कडून भरघोस निधी मिळविण्याचे प्रयत्न करणे.

६) विविध शासकीय योजना व उपक्रमांद्वारे लाभ मिळविणे.

७) शासन यंत्रणांशी संपर्क साधून कर सवलत व अन्य मार्गाने मदत, सवलत मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहाणे.

८) विविध धर्मादाय संस्थांबरोबर संघटितपणे प्रयत्न करून आवश्यक त्या सवलती व मागण्या मान्य करुन घेण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणे.

## अहवाल सालानंतर...

एक
प्रकट मुलाखत


श्री. कृष्णाजी बारकोजी शिर्के


श्री. अरविंद बाळकृष्ण राणे

# असा जन्मला ... मुलुंड मराठा!

बुधवार दि. १०/०४/२०२४ रोजी एक आगळा - वेगळा कार्यक्रम मंडळात सादर झाला. तो म्हणजे आपल्याला ऋषीतुल्य असणारी दोन व्यक्तिमत्वे **श्री. कृष्णाजी बारकोजी शिर्के** आणि **श्री. अरविंद बाळकृष्ण राणे** यांची प्रकट मुलाखत असलेला कार्यक्रम **"असा जन्मला... मुलुंड मराठा"!** या दोन महान विभूतींना एकत्र भव्य व्यासपीठावर पाहण्याचा दुग्धशर्करा योग यावेळी मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना लाभला. मुलुंड मराठा साकारण्यासाठी त्यांना आलेले आणि आपल्या नवीन पिढीला प्रेरणादायी असलेले अनुभव या दोघांनी खूप आस्थेने प्रकट केले. थोडक्यात आदर्श कार्यकर्ता कसा असावा याचे अनेक पैलू त्यांच्याकडून या मुलाखतीच्या माध्यमातून शिकायला मिळाले. ही केवळ एक रंजक मुलाखत नव्हती तर एक उत्तम असे प्रशिक्षण शिबिर होते. छान गप्पामधून, मंडळाच्या उभारणीबद्दलच्या.... अक्षरशः मातीतून निर्माण केल्याच्या जुन्या आठवणी आणि इतिहास सांगितला. त्यावेळी त्यांच्या सोबत असणाऱ्या सर्व थोर दिग्गजांना सलाम!

या दोन्ही दिग्गजांना बोलते करुन सर्व जुन्या आठवणी, इतिहास, नजरेसमोर उभा करण्यास प्रवृत्त करणारे, खुमासदार प्रश्न विचारुन दिलखुलास मुलाखत रंजक करणारे, या कार्यक्रमाचे मुलाखतकार होते.... मंडळाचे विद्यमान **अध्यक्ष श्री. रमेश शिर्के.** मा.अध्यक्षांचे वाक्चातुर्य सर्वच जाणतात. त्यात त्यांचा हात कोणीही धरु शकत नाही. परंतु या कार्यक्रमातून उत्कृष्ट मुलाखतकार हा त्यांचा अजून एक नवीन पैलू सर्वांनी अनुभवला. असा हा बहारदार प्रत्यक्ष माहितीपट सर्व कार्यकर्त्यांना मंत्रमुग्ध, खिळवून ठेवणारी पर्वणी ठरली!




आपल्या मंडळाचे गौरवशाली व देखणे वास्तूशिल्प

## मंडळाची सांस्कृतिक केंद्र इमारत

## मुलुंडचे सांस्कृतिक वैभव वाढवणारी सर्व सोई - सुविधांनी सुसज्ज देखणी इमारत

- तळमजला अधिक वरचे तीन मजले अशी एकूण चार मजली प्रशस्त इमारत.
- या प्रशस्त इमारतीमध्ये प्रत्येकी ५०० आसन क्षमतेची दोन मोठी सभागृहे.
- दोन्ही सभागृहे संपूर्णपणे वातानुकुलित.
- सहा खोल्यांचे विद्यार्थी वसतीगृह व अभ्यासिका.
- विविध साहित्यकृतींनी संपन्न असे सरस्वती वाचनालय.
- सर्व प्रकारची उत्तम खान-पान (कॅटरिंग)व्यवस्था व डेकोरेशनची सुविधा.
- वधू-वर सूचक मंडळ ही अत्यंत लोकप्रिय ठरलेली अद्ययावत व्यवस्था.
- मंडळाचे स्वतंत्र कार्यालय, आरक्षण कक्ष, कॅटरिंग/डेकोरेशन व्यवस्था कार्यालय.
- इमारतीच्या दर्शनी भिंतीवर चितारला आहे, मराठ्यांचा भाग्यशाली व लढाऊ इतिहास!
- इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर महाराष्ट्राचे क्षात्रतेज श्री तुळजाभवानीमातेचे देखणे मंदिर.
- मंडळात चालणारे उपक्रम व विविध सेवा-सुविधा फलकांची प्रवेशद्वारी आकर्षक मांडणी.
- संपूर्ण इमारतीला मजबूत संरक्षण भिंत व वृक्ष संगोपन.
- समारंभ व कार्यक्रमप्रसंगी उपयुक्त व आवश्यक ठरणारा मोठ्या क्षमतेचा जनरेटर.
- विद्युत पुरवठ्यासाठी आवश्यक क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वयीत.
- मुबलक पाणी पुरवठा व सदैव स्वच्छ असणारी प्रत्येक मजल्यावरील प्रसाधन गृहे.
- तिसऱ्या मजल्यापर्यंत जाण्यासाठी उद्वाहन (लिफ्ट) व्यवस्था.
- आधुनिक अग्निशामन यंत्रणा ● सीसीटीव्ही कॅमेरे
- मंडळाची वेबसाइट ●अत्याधुनिक वाय-फाय सुविधा
- संपूर्ण इमारतीत आवश्यक ठिकाणी दूरध्वनीची इंटरकॉम व्यवस्था.
- संपूर्ण इमारतीच्या सभोवार पेव्हर ब्लॉकचे फ्लोअरिंग.

**आगामी गणेशोत्सवाच्या**  **सर्वांना हार्दिक शुभेच्छा**

# कृतज्ञतापूर्वक - ऋणनिर्देश

आपल्या संस्थेच्या आजवरच्या गौरवशाली वाटचालीमध्ये आत्मियतेने साथ देणाऱ्या सर्व व्यक्ती, संस्था, हितचिंतक मित्रमंडळी आमचे आदरणीय सल्लागार सर्वश्री. संजय केशव आयरे, सुरेश गेनभाऊ डुंबरे, नंदकुमार यशवंत माने, सुदाम चंद्रू म्हामूणकर व सौ. चित्रा अरुण धुरी, सर्व सन्माननीय देणगीदार, जाहिरातदार, सभागृह आरक्षणकर्ते, बीनव्याजी ठेवीदार, कार्यक्रमांचे प्रायोजक, विविध कामांचे ठेकेदार, मंडळाचे सभासद बंधू - भगिनी, ज्ञाती बांधव, संस्थेच्या सर्व कार्यक्रम, उपक्रम प्रसंगी उपस्थित राहिलेले मान्यवर पाहुणे, श्रोतृवर्ग यांच्या बरोबरच सन्माननीय श्री. मधुकर भावे, श्री. नरेंद्र वाबळे, डॉ. अरुण धुरी, श्री. स्वप्नील पंडीत, डॉ. दीक्षा पेंडभाजे, सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. संजीवनी जाधव, श्री. मनोज वराडे, डॉ. नटराजन सुब्रमणीयन, डॉ. मंजुषा कुरुवा, डॉ. राजीव कर्णिक, डॉ. अश्विन सावंत, डॉ. सुचेता सावंत, स्वामी प्रत्यानंदजी, माजी आमदार शिशिर शिंदे, मा. नगरसेवक श्री. प्रभाकर शिंदे, श्री, प्रकाश गंगाधरे, श्री. नंदकुमार वैती, माजी आमदार श्री. चरणसिंग सप्रा साहेब व अन्य सर्व मान्यवर मार्गदर्शक, विविध कार्यक्रम, समारंभ आयोजन करणाऱ्या आमच्या सहयोगी संस्था, आचार्य अत्रे जयंती कार्यक्रम समितीमध्ये सहभागी असणाऱ्या मुलुंडमधील विविध नामवंत संस्था, अपना बाजार मुलुंड शाखा, वेळोवेळी सादर झालेल्या कार्यक्रमांचे सादरकर्ते, निर्माते, तंत्रज्ञ, कलाकार, मंडळाच्या विविध समित्यांचे प्रमुख/निमंत्रक, सदस्य, आपल्या सांस्कृतिक केंद्र इमारतीमध्ये चालणारे सर्व शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक वर्गचालक, श्री लक्ष्मी कॅटरर्सच्या चालक सौ. शामल चाळके, श्री. चंद्रशेखर मा. चाळके, त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी, कल्पना इलेक्ट्रीकल्सचे श्री. मनोज सकपाळ, मुंबई महानगर पालिका, मा. जिल्हाधिकारी, तहसिलदार, वास्तू विशारद श्री. गोपाळ उतेकर, मुलुंड व नवघर पोलिस ठाणे, संस्थेच्या कार्यक्रमाला प्रसिध्दी देणारी सर्व वृत्तपत्रे, नियतकालिके, पत्रकार, पत्रलेखक, सरकारमान्य हिशेब तपासनीस सीए सुदीप ठाकूर (ठाकूर, नाईक, देव कंपनी) अंतर्गत हिशेब तपासनीस सीए अमोल सावंत, संस्थेचे सेवक, कामगार कर्मचारी, सुरक्षा रक्षक, सहाय्यक या सर्वांवरोबरच संस्थेला नेहमीच सहकार्य, सहयोग व शुभाशीर्वाद देणारे सर्व मान्यवर रसिक, प्रेक्षक वर्ग आणि सर्व ज्ञात- अज्ञात सहकारी, मार्गदर्शक या सर्वांचे ...........

**मन : पूर्वक आभार!**

**आपणा सर्वांचे सहकार्य, सहयोग, शुभेच्छा व लोभ आहेच तो वृध्दिंगत होवो हीच सदिच्छा !**

कृतज्ञतेच्या भावनेने केलेल्या ऋणनिर्देशाबरोबरच मंडळाच्या कार्यवर्षाचा हा अहवाल येथेच पूर्ण करतो.धन्यवाद!

**सर्वांना नमस्कार!**



कार्यकारी मंडळाच्या अनुज्ञेने

**अजय सिताराम खामकर**

सरचिटणीस